

# महाराष्ट्राचे जिल्हे

## रत्नागिरी

REFBK-0028955

प्रसिद्धि विभाग महाराष्ट्र सरकार मुंबई

# महाराष्ट्राचे जिल्हे

# रत्नागिरी

REFBK-0028955

किंमत २५ नये पैसे

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि विभागाचें प्रकाशन

# अ नु क्र म णि का


| अनुक्रम | प्रकरणाचें नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | परिचय | ५ |
| २ | जिल्ह्याचें शासन | १३ |
| ३ | नैसर्गिक संपत्ति | १६ |
| ४ | शेतकी उत्पादन | २० |
| ५ | उद्योगधंद्याची वाढ | २८ |
| ६ | सहकार | ३३ |
| ७ | शैक्षणिक प्रगति | ३५ |
| ८ | समाज विकास योजना | ४४ |
| ९ | स्थानिक स्वराज्य | ४९ |
| १० | आरोग्य व्यवस्था | ५२ |
| ११ | वृत्तपत्रें, किल्ले व पवित्र क्षेत्रें | ५८ |
| १२ | कोणाकडे कशाची चौकशी करावी | ६४ |


मुखपृष्ठावरील रेखाचित्र– प्रसिद्ध हपूस आंबे

# रत्नागिरी जिल्हा

## परिचय

आपल्या देशांत काश्मीर, कामरूप, केरळ व कोंकण हे प्रदेश विपुल सृष्टिसौंदर्यासाठीं प्रसिद्ध आहेत. रत्नागिरी जिल्ह्याबाबत बोलावयाचें तर हा तीनशें मैल लांब व पंचेचाळीस मैल रुंद भूप्रदेश, निर्गरम्य व मनोहर दृश्यालंकारांनीं नटलेला असून सौंदर्यपूर्ण विविधतेचा ईश्वरी साक्षात्कार घडवून दिल्याशिवाय राहत नाहीं. प्रवासांत ह्या जिल्ह्यांत कुठल्याहि भागांत हिंडत असतां शीण किंवा कंटाळा असा यावयाचाच नाहीं. पावसाळ्यांत नागमोडी रस्त्यावरून जात असतां डोंगरकडे व छोटे छोटे धबधबे पाहून खोल दरींत इंद्र राजानें आपलें सप्तरंगी धनुष्य थोडा वेळ अलगत खालीं ठेवलें आहे कीं काय असा भास होतो.

**भौगोलिक रचना**

उत्तरेला बाणकोटची खाडी, कुलाब्यापासून व दक्षिणेस तरेखोलची खाडी, गोव्यापासून या जिल्ह्याला अलग करते. पूर्वेला सह्याद्रि पर्वत व पश्चिमेस अरबी समुद्र असा हा लांबसडक जिल्हा ५०२०९ चौरस मैल क्षेत्र व्यापतो. जिल्ह्याचा भूप्रदेश खडकाळ असून येथें नौकानयनास उपयुक्त अशा खाड्या आहेत. पावसाचें प्रमाण ८० ते १४० इंच असून हवा दमट आहे.

एकूण ३२,१२,८००एकर क्षेत्रफळापैकीं ८,०३,५०० एकर जमीन लागवडीखालीं व ४६,९५५ एकर जंगल आहे. आंबा, फणस, काजू, नारळ, सुपारी हीं फळफळावळें, थोडासा भात ( तांदूळ ) नागली किंवा वरी हीं पिकें होतात.

जिल्ह्याची लोकसंख्या १९६१ च्या शिरगणतीनुसार १८,२५,००० असून यापैकीं ८,१७,०९० पुरुष व १०,०८,००० स्त्रिया आहेत. जिल्ह्याचे रहिवाशी मुख्यतः शेतीवरच गुजराण करतात.

या जिल्ह्याची लोकवस्ती दाट असून अन्नधान्याचें उत्पादन कमी आहे. वर्षांतील आठ महिन्या-करतां लागणारें जवळ जवळ ५५,००० टन धान्य बाहेरून आणावें लागतें.

## ऐतिहासिक पार्श्वभूमि

कोंकण म्हणजे ठाणें, कुलाबा, रत्नागिरी एवढेच जिल्हे आपण समजतों. परंतु कोंकण प्रदेशाची व्याप्ति उत्तरेस सध्याच्या सुरत जिल्ह्यापासून दक्षिणेंत कारवारपर्यंत आढळते, तथापि कांहीं लोकांच्या बोलण्यांत कोंकण या शब्दाचा अर्थ सध्याचा रत्नागिरी जिल्हा एवढाच करण्यांत येतो.

कोंकणनिर्मितीसंबंधीं पौराणिक कथा अशी आहे– परशुरामानें जिंकलेली सर्व पृथ्वी ब्राह्मणाना दान दिली. दान दिलेल्या प्रदेशांत राहातां येत नाहीं म्हणून त्यानें सह्याद्रिलगतचा समुद्र बाण मारून हटविला व स्वतः राहण्यासाठीं जागा करून घेतली. असेंही सांगतात कीं, वाळवी, समुद्रानें तिच्यावर केलेले उपकार फेडण्याची संधी पाहत होती.यावेळेस तिनें परशुरामाचें धनुष्य पोखरून ठेवलें. परशुराम आपल्या बाणानें समुद्र हटविणार हें तिला आधींच कळलें होतें. परशुरामानें धनुष्याला बाण लावून ओढला. धनुष्य तुटलें पण बाण सुटून समुद्र थोडासाच हटविला गेला. जर वाळवीनें धनुष्य पोखरलें नसतें तर अनेक योजनेपर्यंत समुद्र मागें जाऊन तेथें जमीन तयार झाली असती.

परशुरामाच्या आईचें नांव "कोकण्णा" होतें. म्हणून ह्या भूप्रदेशाला त्यानें आपल्या आईच्या स्मरणार्थ कोंकण असें नांव दिलें. कांहीं लोक कोंकणचा उल्लेख परशुरामक्षेत्र असा पण करतात.

शिवाजी महाराजांच्या वेळींसुद्धां या रत्नागिरी जिल्ह्यांत अनेक घडामोडी घडल्या. त्यावेळीं रत्नागिरी ते कारवारपर्यंतचा भाग विजापूरच्या रुस्तुमिजान नांवाच्या सरदाराकडे होता. त्यावेळीं दाभोळ, राजापूर व कारवार हीं फार प्रसिद्ध बंदरें होतीं. परदेशाशीं आयात-निर्यात त्यावेळीं या बंदरांतून होत असे. जंजिराच्या सिद्दीकडे त्यावेळीं हीं बंदरें होतीं. रुस्तुमिजान-कडून शिवाजी महाराजांनीं हीं बंदरें ताब्यांत घेतलीं. तसेंच दापोली व संगमेश्वर हीं पण ताब्यांत घेतली. या दरम्यान इंग्रजाशीं व आदिलशहाच्या फौजेशीं शिवाजी महाराजांच्या फौजेच्या बऱ्याच चकमकी उडाल्या.

**शिवाजी महाराज व दक्षिण कोंकण**

राजापूरला जम बसवून शिवाजी महाराजांनीं खारेपाटण कब्जांत घेतलें. इतक्यांत (१६६१सालीं) शृंगारपूरचा सूर्यराव सुर्वे याने संगमेश्वर ताब्यांत असलेल्या तानाजीवर हल्ला केला. तेव्हां शिवाजी महाराजांनीं सूर्यराव सुर्वेचा बंदोबस्त करून त्याचा एक सरदार शिर्के यास जवळ केलें व त्याची मुलगी सोयराबाई हिच्याशीं लग्न केलें. पुढें शिवाजी महाराजांनीं वेंगुर्ला व कुडाळ हा भाग काबीज केला. रत्नागिरी जिल्ह्यांत एकूण ५८ किल्ले दुरुस्त केले व बांधले. मालवणला सिंधुदुर्ग किल्ला २५ नोव्हेंबर १६६४ रोजीं बांधण्यास सुरवात झाली. तो तीन वर्षांत पुरा झाला. त्याचें बांधकाम गोविंद विश्वनाथ प्रभू सुभेदार यांच्या देखरेखीखाली झालें. या किल्ल्यावर पोर्तुगीज कारागीरहि होते. यावेळीं मालवण बंदर फार भरभराटीला आलें. सिंधुदुर्ग किल्ल्याची जागा एका कोळयानें शिवाजी महाराजांना दाखविली होती. विजयदुर्ग किल्ला महाराजांनीं दुरुस्त केला. त्या वर्षाच्या संवत्सराच्या नांवावरून ( विजयनामसंवत्सरे ) त्याला विजयदुर्ग नांव पडलें असावें.

शिवाजी महाराजांची राजधानी रायगड ही कोंकण व देश यांच्या सरहद्दीवर होती. त्यामुळें देशावरील व कोंकणांतील राजकीय घडामोडीशीं निकटचे संबंध त्यांना ठेवतां येत. रायगडावरून इंग्रज, पोर्तुगीज व सिद्दी यांच्या हालचाली शिवाजी महाराजांना कळत. त्यांच्या आरमारांत भिवजी गुजर हा मुख्य होता व त्याच्या हातांखालीं तुकोजी आंग्रे होता. शिवाजी महाराजानंतर गुजर व आंग्रे यांचें वांकडें आलें. पुढें तुकोजी आंग्र्यांच्या कान्होजी नांवाच्या मुलानें गुजरला अटकेंत ठेवलें. गुजर अटकेंत मरण पावला व कान्होजी आंग्रे हा आरमारप्रमुख झाला. रायगड पडल्यावरहि मुसलमानांचा अंमल कान्होजीनें स्थिर होऊं दिला नाहीं. आंग्र्यांचा मूळ गांव हर्णै (दापोली) आंगरवाडी हा होय. आंग्र्यांचा दरारा पश्चिम समुद्रांत मुंबईपासून मंगळूरपर्यंत होता. इंग्रजांचें जहाज सुखरूप बंदरांत पोंचविल्याबद्दल आंग्र्यांना जहाजामागें पांच हजार रुपये द्यावे लागत. त्याकाळीं पोर्तुगीज, डच, फ्रेंच व इंग्रज यांपैकीं कोणाचीही पूर्ण सत्ता समुद्रावर चालत नसे.

**मराठ्यांचें आरमार**

इंग्रजांचा गव्हर्नर बून यानें आंग्र्याची खोड मोडण्यासाठीं १७१५ सालीं मुंबईंत तीन वर्षात ९ लढाऊ जहाजें बांधलीं. १७१७ मध्यें विजयदुर्गावर त्यानें स्वारी केली. पण कान्होजी आंग्र्यापुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं व त्यास हार खावी लागली. पुन: १७२१ मध्यें इंग्रजांनीं स्वारीसाठीं तयारी केली पण त्यांनाच हार खावी लागली. नंतर कान्होजीचा मुलगा संभाजी यानें वसईच्या स्वारींत चिमाजी अप्पाला चांगली मदत केली. राजाराम चंदीहून आल्यावर त्यानें कान्होजीस 'सरखेच' हा किताब दिला. सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग हीं त्यावेळचीं आरमारी साहित्याचीं कोठारें होतीं व कुलाबा हें आरमाराचें मुख्य ठाणें होतें. पुढें मोंगलांनी संभाजीला ठार मारल्यानंतर जंजिऱ्याच्या सिद्दीनें महाड, नागोठाणे, मंडणगड, सुवर्णदुर्ग, महाल अंजनवेल आंग्रेकडून हस्तगत केलें.

संगमेश्वरला सध्या सरदेसायांचा एक वाडा आहे. या वाड्यांत छत्रपति संभाजी राजे कलुषा कबजीसह असतांना त्यांच्यावर औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान यानें अचानक हल्ला करून त्यांना १ फेब्रुवारी १६८९ रोजीं अटक केली.

चिपळूणहून उत्तरेस दोन मैलांवर परशुराम देवस्थान आहे. ते या भागांतलें मोठें देवस्थान मानलें जातें. येथें ब्रम्हेंद्रस्वामी १६९८ पासून उदयास आले. त्यांना बाळाजी विश्वनाथ पेशवे, बाजीराव, चिमाजी आप्पा, आंग्रे, प्रतिनिधि आणि खुद्द शाहू महाराज पूज्य मानीत. जंजिऱ्याचा अधिकारी सिद्दी रसूल याकूतखान हाहि स्वामींना अत्यंत मान देत असे. त्यानें पेंढे व आंवडस हीं गांवें स्वामींच्या देवस्थानाला इनाम दिलीं होतीं.

**परशुराम क्षेत्र**

पानिपतच्या युद्धांत सदाशिवराव भाऊ मृत्यु पावले. नंतर त्यांचें नांव धारण करून एक तोतया थोरल्या माधवराव पेशव्यांच्या वेळीं निर्माण झाला होता. त्याला नाना फडणवीसांनीं रत्नागिरीच्या किल्ल्यांत कैदेंत ठेवलें होतें. यानें १७७६ सालीं जून ते सप्टेंबर दरम्यान कोंकणांत बराच धुमाकूळ घातला होता.

**तोतयाचें बंड**

सध्या सावंतवाडी तालुका नांवानें ओळखल्या जाणाऱ्या भागावरहि चालुक्य, यादव, व विजयनगरचे राजे राज्य करीत होते. नंतर विजापूरच्या आदिलशहाची सत्ता सोळाव्या शतकांत होती. सोळाव्या शतकांत सावंतानीं तेथें आपली सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला पण तो यशस्वी झाला नाहीं. पुढें खेम सावंत, लखम सावंत व सोम सावंत यांनीं या प्रांतावर सत्ता प्रस्थापित करण्याचें काम १७ व्या शतकांत केलें. त्यांचा प्रदेश सह्याद्रीच्या पूर्वेस चंदगड व पश्चिमेस सध्यांच्या वेंगुर्लें महालापर्यंत होता. मध्यंतरी शिवाजी महाराजांनीं वाडीच्या सावंतांची भेट घेतली व कणकवली मालवणपर्यंत प्रदेश काबीज केला. त्यावेळी भेट म्हणून सावंत यानीं शिवाजी महाराजांना एक तलवार दिली.

**सावंतवाडी संस्थान**

१७५५ मध्यें ब्रिटिशांनी हल्ला करून यशवंत गड (रेडी येथील किल्ला) काबीज केला. त्याच वेळीं सध्याचा वेंगुर्ले महाल हा सावंतांचा भाग ब्रिटिशांच्या ताब्यांत गेला. सावंतवाडीचे सावंत हे अत्यंत शूर होते. त्यांचे पोर्तुगीज, आंग्रे, कोल्हापूरकर यांच्याशीं कांहींना कांहीं कारणावरून तंटे होत. अनेकांशीं झगडून त्यांनीं आपलें छोटेंसें राज्य टिकविलें. १८१८ मध्यें पेशव्यांना जिंकल्यावर ब्रिटिशांनीं सावंतवाडी जकून हें संस्थान कायम केलें. स्वातंत्र्यानंतर हें संस्थान भारतांत विलीन झालें.

## लोक आणि लोक-जीवन

या जिल्ह्यांत ब्राह्मण, मराठे, भंडारी, तिल्लोरी कुणबी, हरिजन, नवबौद्ध व मुसलमान असून कांहीं भागांत ख्रिश्चन आहेत.

या भागांत चित्तपावन ब्राह्मणांचीं अनेक घराणीं आहेत. या समाजांत बरेच कर्तबगार योद्धे व मुत्सद्दी निर्माण झाले. कऱ्हाडे ब्राह्मणांत खोत, कुलकर्णी, महाजन, इनामदार व पुरोहित आहेत. जयगड खाडीत, संगमेश्वर, चिपळूण, रत्नागिरी व दाभोळ येथें देवरुखे ब्राह्मणांची वस्ती आहे. या समाजांतील लोक खोत, कुलकर्णी व पौरोहित्याचें काम करीत. कऱ्हाडे ब्राह्मण व देवरुखे ब्राह्मणांची अधिकतर वस्ती पाटाच्या पाण्याच्या ठिकाणीं डोंगराळ भागांत दिसून येते.

**ब्राह्मण**

सारस्वत ब्राह्मणाची वस्ती दक्षिण रत्नागिरी जिल्ह्यात जास्त दिसून येते. हे लोक खोत, कुलकर्णी व अशाच प्रकारचे हुद्देदार म्हणून काम करीत. दैवज्ञ ब्राह्मणांची वस्ती पण दक्षिण भागांत दिसून येते. हे लोक सोने—चांदीचे दागिने करण्याचा व्यवसाय करतात.

रत्नागिरी जिल्ह्यांत समुद्र किनाऱ्यावर भंडारी लोकाची वस्ती जास्त आहे. नारळीच्या झाडापासून माडी काढणें व दारू विक्रीचा व्यवसाय ब्रिटिशांच्या वेळीं हे लोक करीत. कांहीं ठिकाणीं शेतीचा व नौकानयनाचा व्यवसायहि हे लोक करतात. हे लोक करारी वृत्तीचे, धाडसी व पराक्रमी असून कलाकौशल्याचाहि गुण यांच्यांत प्रकर्षानें दिसून येतो. शिवाजी महाराजांच्या व पेशव्यांच्या वेळीं या लोकांचा आरमारांत भरणा होता. गायक, वादक, नट व शिल्पकार म्हणून या समाजांतील बरेच लोक पुढें आलेले आहेत.

**भंडारी**

चांद्रसेनीय कायस्थ प्रभू घराणीं मराठ्यांच्या ऐतिहासिक काळांत बरींच पुढें आलीं होतीं. यांची वस्ती मडणगड, खेड, दापोली तालुक्यांत दिसून येते. हे खोत व कुळकर्णी म्हणून काम करायचे.

कोंकणांतील मराठे हे बऱ्याच प्रमाणांत आदिलशाहींत व कांहीं थोड्या प्रमाणांत शिवाजी महाराजांच्या वेळीं देशावरून कोकणांत आलेले असावेत असें इतिहासावरून दिसतें. यांचीं दैवतें देशावरली आहेत. या लोकांतील बरेच लोक खोत व इनामदार होते. हे लोक लढाऊ वृत्तीचे असून त्यांच्यांतील बरेच सैन्यांत नोकऱ्या करतात; परंतु त्यांचा मुख्य व्यवसाय मात्र शेतीचा आहे. **मराठे**

कुणब्यांची वस्ती राजापूर ते कुलाबा जिल्ह्यांतील साधारणत: महाड-माणगांव तालुक्यापर्यंतच्या भागांत विशेष दिसून येते. हे लोक शेती करणारे, परंतु त्यांच्या मालकीची जमीन फारच कमी आहे. यांची वस्ती जिल्ह्यांतील एकूण लोकसंख्येच्या ४० ते ५० टक्के आहे. **कुणबी** हा समाज शिक्षणदृष्ट्या मागासलेला परंतु वृत्तीनें गरीब, प्रामाणिक व विश्वासू आहे. यांना कुणबी, कुळुंबी, किंवा कुळवाडी म्हणतात.

या शिवाय या जिल्ह्यांत वैश्य वाणी आहेत. व्यापार हा यांचा धंदा.

हरिजन वस्ती प्रत्येक गांवांत बहुधा असतेच व दोन-तीन गांवामिळून एखाद्या गांवांत चांभारांची वस्ती पण असते.

त्वष्टा कासार लोकांची कांहीं ठिकाणीं वस्ती असून ते तांब्यापितळेच्यीं भांडीं घडविण्याचा व भांड्यांना कल्हई लावण्याचा धंदा करतात. याशिवाय बांगडीवाले कासार आहेत.

या भागांत ग्रामदेवतेची पूजा करणारे गुरव जातीचे लोक आहेत. यांत दोन प्रकार आहेत. एक भाविक गुरव व दुसरे लिंगायत गुरव. लिंगायत गुरव हे आपल्या मुलांच्या मुंजी करतात व मुंजीच्या वेळीं गळ्यांत शंकराचें लिंग चांदीच्या करंड्यांत घालून **गुरव** बांधतात व रोज शिवलिंगाची पूजा करतात. शंकराच्या देवळांत हेच लोक पुजारी असतात.

## सांस्कृतिक परंपरा

या जिल्ह्यांतील लोकांच्या चालीरीती बऱ्याच प्रमाणांत वेगळ्या आढळून येतात. मराठी ही जरी एकमेव प्रमुख भाषा असली तरी येथें मराठी बोलींचे तीन चार प्रकार आढळून येतात.

रत्नागिरी जिल्ह्यांतील लोक अनेक ठिकाणांहून आलेले दिसतात. यांत थोडे जैनहि आहेत. हिंदूंचा भरणा अधिक व यांच्या खालोखाल मुसलमान व ख्रिश्चन धर्मीय लोक आहेत.

येथील लोकांच्या चालीरीतीवरून उत्तर व दक्षिण संस्कृतीचा सुरेख मिलाफ येथें दिसून येतो. लग्नांत व इतर कांहीं धार्मिक विधींत होमहवन, स्थानिक ग्रामदेवतांची पूजा, शेता- **धार्मिक विधि** साठी कोंबडें बळी देणें, पिशाच्यांना नारळ अर्पण करणें इत्यादि प्रकार रूढ आहेत.

" भगतां " च्या अंगात पिशाच्च येतें असें म्हणतात. देवीचा कौल घेण्यासाठीं ग्रामदुर्गला फुलांच्या कळ्या लावण्याची पद्धत बऱ्याच ठिकाणीं आहे. रामनवमी, हनुमान जयन्ती, भवानी उत्सव, श्रीकृष्ण जन्मोत्सव वगैरे उत्सव दरसाल गांवोगांव मोठ्या प्रमाणांत साजरे होतात.

या भागांतील मुख्य सण म्हणजे शिमगा ( हुताशनी –पौर्णिमा ) व गौरीगणेशोत्सव. या दोन्ही सणाच्या वेळी कोंकणांत जाण्यासाठीं लोकांची रीघ लागलेली असते.

**ग्रामदेवता**

रत्नागिरी जिल्ह्यांत ग्रामदुर्गा म्हणजे प्रत्येक गांवांत सार्वजनिक देऊळ असतें. स्त्री देवतांचीं नांवें जाखाई, जुगाई, मानाय, वाघजाय व पुरुष देवतांचीं नांवें वीर व केदार अशीं असतात. देवतांच्या चांदीच्या प्रतिमा पालखींत बसवून उत्सवांत हौसेनें मिरवीत नेतात. गौरी सणाच्या वेळीं इकडील कुणबी व तत्सम लोकांत नाचाची पद्धत आहे. हे नाच वाडी-वाडींतून गटागटानें होतात. मध्यें मृदंग व सभोंवतालीं लोक नाचतात. या नाचाला जाकडी म्हणतात. विशेषत: गौरीपूजनाचे वेळीं हे नाच घरोघरीं करतात.

शिमग्याच्या वेळीं जे नाच केले जातात त्यांस खेळे म्हणतात. हा एक लोकनृत्याचा प्रकार आहे. यांत जुने महाराष्ट्रीय पोशाख करतात. लांकडी मुखवटे लावून हे नाच करतात. लग्नमुंजीच्या समारंभांच्या वेळी हे होतात. येथें लोक नवरात्राच्या वेळीं गोंधळसुद्धां घालतात.

शामजी नाईक काळे ( इ० स. १७२८ ) यांनीं दशावतार हा लोकनाट्याचा प्रकार कोंकणांत प्रचारांत आणला असें सांगतात. हा प्रकार नाटकाइतकाच मनोरंजक असतो.

**दशावतार**

कार्तिक शुद्ध पौर्णिमेपासून जत्रांचा हंगाम सुरू होतो व तो पावसाळ्यास आरंभ होईपर्यंत चालतो. ह्या काळांत गांवोगांवच्या ग्रामदेवतांच्या जत्रा भरत असतात व दशावतारी खेळ केले जातात. गणपतीच्या आगमनानें खेळास सुरुवात होते. तो आशीर्वाद देऊन निघून जातो. नंतर मोरावर आरूढ झालेली सरस्वती अवतीर्ण होते व नृत्य करून अदृश्य होते. तमाशांत सोंगाड्याला जें महत्त्व तेंच दशावतारामध्यें संकासुरास असतें. आपल्या कोटिबाजपणानें तो श्रोत्यांची चांगलीच करमणूक करतो. नंतर भगवान् श्रीकृष्ण येतात. त्या दोघांचें वर्णाश्रमासंबंधी वाग्युद्ध होते व त्याची परिणती अखेर प्रत्यक्ष युद्धांत होऊन श्रीकृष्णाच्या हातून संकासुराचा वध होतो.

यापुढेंच खऱ्या नाटकास सुरुवात होते. उषास्वप्न, द्रौपदीवस्त्रहरण, कीचकवध, कौरव-पांडव यासारखा पौराणिक विषय निवडला जातो. नाटक लिहून पाठ केलेले नसतें. त्यामुळें कलावंताच्या कल्पकतेची आणि कौशल्याची ती कसोटीच असते. तेंच त्यांचें वैशिष्ट्य. खेळ पहांटेपर्यंत चालतो. दरम्यान ऋद्धिसिद्धि, प्रेक्षकांमध्यें फिरून आरती ओवाळतात व प्रेक्षक आपापल्या कुवतीप्रमाणें त्यांत ओवाळणी टाकीत असतात. शेवटी प्रतिष्ठित गांवकऱ्यांच्या हस्तें हंडी फोडली जाते व कार्यक्रमाची समाप्ति होते.

**नरश्रेष्ठांची जन्मभूमि**


लोकसभेचे भूतपूर्व अध्यक्ष कै. दादासाहेब मावळंकर , आपल्या राज्यघटनेचे शिल्पकार कै. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पूर्वीच्या मुंबई राज्याचे मुख्यमंत्री कै. बाळ गंगाधर खेर, सध्याचे केंद्रीय मंत्री श्री. स. का. पाटील, सर्वोदय कार्यकर्ते आचार्य विनोबा भावे, पू. आप्पासाहेब पटवर्धन, कै. कृ. प्र. खाडिलकर, श्री. तात्याराव सावरकर, शिक्षणतज्ज्ञ कै. रा. वि. परुळेकर, श्री. मामा वरेरकर, सेनापती बापट वगैरे थोर व्यक्तींनीं या जिल्ह्यांतच जन्म घेतला.

गल्या शंभरदीडशें वर्षांत महाराष्ट्राला नेत्यांचा पुरवठा रत्नागिरी जिल्ह्यानें बऱ्याच प्रमाणांत केला आहे. डॉ. सर रामकृष्ण भांडारकर हे मालवणांत जन्मले. श्री. गोपाळ कृष्ण गोखले यांचा जन्म कोतळूकला गुहागर तालुक्यांत झाला. महर्षि धोंडो केशव कर्वे हे मुरुडचे (तालुका दापोली), रँग्लर रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे हे मुर्डीचे ( ता. दापोली ), साने गुरुजी हे पालगडचे ( ता. दापोली), अशी कितीतरी नांवें सांगतां येतील.

## लोकमान्य टिळकांची जन्मभूमि

लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचा जन्म २३ जुलै, १८५६ रोजीं रत्नागिरी येथें झाला. लोकमान्यांचे वडील गंगाधरपंत रत्नागिरीच्या प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक होते. टिळकांच्या जन्मस्थानीं त्यांचें स्मारक उभारावें म्हणून लोकांनीं सुमारें ८००० रुपयांचा निधि जमा करून त्यांच्या जन्मस्थानापाशीं एक अर्धाकृति पुतळा १९४४ सालीं उभारला. भगिनी मंडळामार्फत स्त्रियांकरतां चालणाऱ्या निरनिराळ्या कार्यक्रमासाठीं टिळक स्मारक समितीतर्फे एक सभागृहहि बांधण्यांत आलें आहे.

---



कुलाबा जिल्हा
जिल्हयाचें शासन
जिल्ह्याची सीमा
तालुक्याची सीमा
तालुक्याचें मुख्य ठिकाण
जिल्हयाचें मुख्य ठिकाण
जिल्ह्यांतील मुख्य रस्ते
सातारा जिल्हा
मंडणगड
हर्णै
दापोली
खेड
चिपळूण
गुहागर
कराडकडे
संगमेश्वर
देवरुख
रत्नागिरी
आंबाघाट
लांजा
कोल्हापूर जिल्हा
राजापूर
देवगड
निपाणीकडे
कणकवली
मालवण
कुडाळ
बेळगांवकडे
बेळगांव जिल्हा
सांवतवाडी
वेंगुर्लें
गोवें

# जिल्ह्याचें शासन

जिल्ह्यांत शांतता व व्यवस्था राखण्याचें काम पोलीस व महसूल विभागामार्फत करण्यांत येतें. महसूल विभाग राष्ट्रीय विस्तार योजनासुद्धां कार्यान्वित करतें. जिल्हा लोकल बोर्ड, नगरपालिका, ग्रामपंचायती, जनगणना इत्यादि निरनिराळ्या कार्यांची देखरेख जिल्हाधिकारी करतात. जिल्ह्याची विभागणी चार प्रांतांत झाली आहे. दापोली प्रांतांत मंडणगड व दापोली हे तालुके येतात. चिपळूण प्रांतांत खेड, चिपळूण, गुहागर, संगमेश्वर हे तालुके येतात. रत्नागिरी प्रांतांत रत्नागिरी, लांजा महाल, राजापूर, देवगड हे तालुके येतात व सावंतवाडी प्रांतांत कणकवली ( महाल ), कुडाळ ( महाल ), मालवण, वेंगुर्ला ( महाल ) व सावंतवाडी हे तालुके येतात.

जिल्ह्याची एकूण जमाबंदी रुपये १४,०३,१७५ आहे.

### जिल्हा विभाग प्रमुख

१) जिल्हाधिकारी, रत्नागिरी ( कलेक्टर )

२) जिल्हा पोलीस प्रमुख, रत्नागरी

३) जिल्हा व सेशन जज्ज, रत्नागिरी

४) एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, रत्नागिरी

५) सिव्हिल सर्जन, रत्नागिरी

६) जिल्हा आरोग्याधिकारी, रत्नागिरी

७) जिल्हा शेती अधिकारी, रत्नागिरी

८) जिल्हा अबकारी व दारुबंदी अधिकारी, रत्नागिरी

९) असिस्टंट रजिस्ट्रार को–ऑपरेटिव्ह सोसायटीज, रत्नागिरी

१०) जिल्हा प्रसिद्धि अधिकारी, रत्नागिरी

११) समाज–कल्याण अधिकारी, रत्नागिरी

१२) जिल्हा शिक्षणाधिकारी, रत्नागिरी

१३) जिल्हा शासनाधिकारी, रत्नागिरी
( जिल्हा स्कूलबोर्ड, रत्नागिरी )
(१३ अ.) जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी

१४) एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर रत्नागिरी
( वेस्ट कोस्ट रोड डिव्हिजन )

१५) जिल्हा अधिकारी, ग्रामोद्योग व औद्योगिक सहकारी संस्था रत्नागिरी

१६) सुपरिन्टेंडेंट ऑफ फिशरीज, रत्नागिरी

१७) एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, मरिन डिव्हिजन, रत्नागिरी

१८) असिस्टंट इंजिनिअर, इलेक्ट्रिक ग्रीड, रत्नागिरी

१९) एम्प्लॉयमेंट एक्सेंज ऑफिसर, रत्नागिरी

२०) इन्कमटॅक्स ऑफिसर, रत्नागिरी

२१) सुपरिंटेंडेंट ऑफ पोस्ट ऑफिसेस, कोंकण डिव्हिजन, रत्नागिरी

२२) सुपरिंटेंडेंट ऑफ सेंट्रल एक्साइज, रत्नागिरी

२३) डिव्हिजनल कंट्रोलर, स्टेट ट्रान्स्पोर्ट, रत्नागिरी

२४) प्रेसिडेंट, जिल्हा लोकल बोर्ड, रत्नागिरी

२५) जिल्हा कमांडंट, होमगार्ड, रत्नागिरी

२६) सर्वे सेंटर ऑफ् सेंट्रल मरिन फिशरीज रीसर्च स्टेशन, रत्नागिरी

२७) सुपरिंटेंडेंट मेंटल हॉस्पिटल, रत्नागिरी

२८) व्हेईकल इन्स्पेक्टर, रत्नागिरी

२९) ॲडिशनल कन्सॉलिडेशन ऑफिसर, रत्नागिरी

३०) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, रत्नागिरी

३१) सुपरिन्टेंडेंट ऑफ् स्कूल ऑफ् इंडस्ट्रीज, रत्नागिरी

३२) मेडिकल ऑफिसर, मलेरिया, रत्नागिरी

३३) प्रिंसिपॉल, पोलिटेक्नीक, रत्नागिरी

३४) प्रिंसिपॉल, इंडस्ट्रीअल ट्रेनिंग इन्स्टीटयूट, रत्नागिरी

**न्यायदान**

न्यायदान व अंमलबजावणी विभागांची फारकत झाल्यापासून महसुली बाबीं व कूळ कायद्याखालील खटले सोडून फौजदारी व दिवाणी कामें सिव्हिल जज्ज पाहतात. ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट म्हणूनहि ते काम पाहातात. त्यांच्यावर डिस्ट्रिक्ट आणि सेशन्स जज्ज असतात व ते हायकोर्टाला जबाबदार असतात. डिस्ट्रिक्ट आणि सेशन्स जज्जांना ॲडिशनल सेशन्स जज्ज मदत करतात.

सिव्हिल जज्ज तथा फर्स्ट क्लास ज्युडिशियल मॅजिस्ट्रेटचीं कोर्टें पुढील ठिकाणीं आहेत

दापोली, चिपळूण, देवरूख, रत्नागिरी, राजापूर, कणकवली, देवगड, मालवण, वेंगुर्लें व सावंतवाडी.

**पोलीस विभाग**

डिस्ट्रीक्ट सुपरिंटेंडेंट ऑफ् पोलीस हे जिल्ह्यांतील पोलीस विभागाचे प्रमुख होत. त्यांना मदतनीस म्हणून सावंतवाडी येथें एक डेप्युटी सुपरिंटेंडेंट ऑफ् पोलीस व चिपळूण येथें एक पोलीस इन्स्पेक्टर असतात. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणीं एक पोलीस सब् इन्स्पेक्टर असतो जिल्ह्यांत बिनतारी संदेशाची व्यवस्थाहि आहे.

**होमगार्डस् संघटना**

या जिल्ह्यांत १९४९ सालापासून होमगार्ड संघटना कार्य करीत असून बहुतेक सर्व तालुक्यांत होमगार्ड पथकें आहेत. २० ते ५० वर्षे वयाच्या शारीरिक दृष्ट्या मजबूत असलेल्या कोणाहि नागरिकास ह्या संघटनेंत दाखल होतां येतें. सामाजिक आणि राष्ट्र उभारणीच्या कार्यांत ही संघटना महत्त्वाचा हातभार लावते.

सध्यां जिल्ह्यांतील होम गार्डांची एकूण संख्या ३५० आहे. रत्नागिरी येथें स्त्रियांचेंहि एक पथक आहे.

**दारुबंदी**

संपूर्ण दारुबंदी अंमलांत आल्यापासून दारुबंदी व अबकारी विभागाचें काम बेकायदा दारू गाळण्यास प्रतिबंध करणें, मद्यार्कयुक्त औषधांच्या वापरावर नियंत्रण ठेवणें, दारूचे परवाने देणें आणि दारुबंदीचा प्रचार करणें एवढ्यापुरतेंच मर्यादित झालें आहे. दारुबंदीमुळें निराधार झालेल्या लोकांचें पुनर्वसन करणें हें या विभागचें महत्त्वाचें कार्य होतें. तें जवळजवळ पुरें होत आलें आहे. दारुबंदीमुळें या जिल्ह्यांतील सुमारें २००० लोक कामधंद्यास मुकले होते. त्यांच्या पैकीं सुमारें १००० लोकांना कर्जे देणें, नीरा केंद्रें व जंगल कूप्स चालविण्यास देणें आदि मार्गांनीं सहाय्य देण्यांत आलें आहे. दारुबंदीच्या प्रचाराकरतां जिल्ह्यांत एका अधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत आली आहे.

**एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज कार्यालय**

जिल्ह्यांत एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज कार्यालय मार्च १९५९ मध्यें उघडण्यांत आलें. येथें नोकरीसंबंधी मोफत माहिती देण्याचें कार्य करण्यांत येतें. १–९–१९६० रोजीं नोकऱ्यांच्या जागा एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज कार्यालयाला कळविण्याबाबतचा कायदा अंमलांत आला. आतां सरकारी, निमसरकारी कचेऱ्यांना व खाजगी संस्थांना आपल्या कार्यालयांतील भरावयाच्या नोकरीच्या जागा या कार्यालयाला कळवाव्या लागतात. याशिवाय इतर जिल्ह्यांतील एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजच्या सहाय्यानें नोकऱ्यांच्या जागा भरण्यांत येतात.

रत्नागिरी जिल्ह्यांतील बऱ्याच तरुणांची जिल्हा एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजमार्फत भरती करण्यांत आली. तसेंच पोस्ट विभागांत सर्व कारकुनी जागांची भरती एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजमार्फत करण्यांत आली.

---

# नैसर्गिक संपत्ति

ज्या देशामध्यें खनिज संपत्तीचे भरपूर सांठे सांपडतील त्या देशाचा औद्योगिक व आर्थिक विकास लवकर घडून यतो. रत्नागिरी जिल्ह्यामध्यें निरनिराळ्या प्रकारच्या खनिज संपत्तीचे विपुल सांठे असल्याचें आढळून आलें आहे.

**लोखंड**

वेंगुर्लें तालुक्यांतील रेडी, टांक, आसोली, आजगांव, दाभोली, तेंडोली, शिरोडें व नानोस या ठिकाणीं आणि सावंतवाडी तालुक्यांतील तळवडें, गुळदुवें, किनळे, कवठणी, सातार्डें, साटेली, आरोस, ठाकूरवाडी, मळेवाड, मातोंड वगैरे ठिकाणीं अशुद्ध लोखंडाचे सांठे सांपडले आहेत. त्यापैकीं रेडी, साटेली, आरोस, तेंडोली आणि खानोली येथील सांठे तर उत्तम प्रतीचे आहेत. रेडी येथील सांठे समुद्रालगतच्या भागापासून तो पूर्वेकडे दोन मैलांच्या परिसरांत पसरलेले आहेत. या अशुद्ध लोखंडामध्यें बेंडेड हेमाटाईट क्वार्टझाईट मिसळलेलें असतें. तें बाजूला केल्यावर खऱ्या लोखंडाचे सांठे हातीं लागतात. रेडी येथील खाणी २००० फूट रुंद व १०० फूट खोल आहेत.

अशुद्ध लोखंड तीन स्वरूपांत सांपडतें, (१) लॅटेरिटिक लोखंड, (२) लॅमिनेटेड लोखंड, (३) मॅसीव लोखंड. या भागांतील खाणींतून लॅमिनेटेड लोखंड जास्त सांपडतें. त्यांत ५५ ते ६० टक्के लोखंडाचा अंश असतो. रेडी येथें २५ ते ४० दशलक्ष टन लोखंड सांपडू शकेल असा अंदाज आहे. सध्या रेडी येथील खाणींतून अशुद्ध लोखंड काढण्याचें काम खाजगी कंपन्यांकडून चालू आहे. हें लोखंड जपानमध्यें पाठविलें जातें. दरवर्षीं सुमारें ५ लक्ष टन अशुद्ध लोखंड रेडी येथून निर्यात केलें जातें. त्याकरितां दोन तात्पुरते लहान धक्के बांधण्यांत आले आहेत. ह्या खाणीमध्यें सुमारें ५००० च्या वर मजूर काम करतात.

**क्रोमाइट**

रत्नागिरी जिल्ह्यांतील कणकवली, जानोली आणि वागदें येथें क्रोमाइट सांपडलें असून कणकवली येथील सांठे फार महत्त्वाचे आहेत. ते काढण्यास येथें नुकतीच सुरुवात झाली आहे. जसजसें खोलवर जातां येईल तसतसें चांगलें क्रोमाइट मिळू शकेल. भारत सरकारनें केलेल्या भूगर्भशास्त्रीय पाहणीवरून कणकवली येथें सुमारें ७०,००० टन क्रोमाइट मिळूं शकेल असा अंदाज आहे. तथापि हा सांठा आणखी जास्त असण्याचीहि शक्यता आहे. येथून अर्ध्या मैलावर असलल्या जानोली गांवींहि क्रोमाइट सांपडलें असून तें कणकवली येथल्यासारखेंच उत्तम प्रतीचें आहे. तसेंच दोन मैलांवरील वागदें येथें ३००० फूट लांबीच्या व ५० फूट रुंदीच्या पट्ट्यांत त्याच प्रतीचें क्रोमा-

इट सांपडलें आहे. या बाबतींत संशोधन करण्यास बराच वाव आहे. बाजारांत चांगला भाव येण्यासाठीं खाणीतून काढण्यांत येणाऱ्या क्रोमाइटवर प्रक्रिया करून त्याची प्रत वाढवावी लागेल.

**लिमेनाइट**

रत्नागिरी जिल्ह्यांत लिमेनाइटचे अनेक सांठे आढळून आले आहेत. रत्नागिरी शहराच्या दक्षिण व उत्तरेकडील सुमारें २५ मैलांच्या टापूंत मालगुंड, उरी, तिवरी, जयगड, पानसळ, दापोली, दाभोळ, जैतापूर, कुवेशी ,वगैरे ठिकाणीं हे सांठे आहेत. मालगुंड, उरी व तिवरी येथील सांठे तर फार महत्त्वाचे आहेत.

पावसाळयांत भरतीच्या लाटांबरोबर लिमेनाइट जातीची वाळू किनाऱ्यावर येते. मालगुडच्या किनाऱ्यावर दीड मैल लांब व १०० फूट रुंदीचा लिमेनाइटचा पट्टा दिसतो. हे सांठे सुमारें २० लक्ष टन तरी भरतील असा अंदाज आहे. यांतील शुद्ध लिमेनाईटचें प्रमाण २५ ते ५५ टक्केपर्यंत आहे.

**सिलीका**

कांच तयार करण्याकरतां लागणारी वाळू रत्नागिरी जिल्ह्यांतील वेंगुर्ले, मठ, वतोरें, चेंदवण, वालावल, कवठणी, तेंडोली, आचरें, मिठबांव वगैरे भागांत सांपडते. सध्यां यापैकीं वेतोरें, चेंदवण व वालावल येथील वाळू काढली जाते. ही वाळू सफेत, लाल किंवा पिंगट रंगाची असते. सामान्यत: सफेत वाळूला व्यापारी दृष्टीनें भाव चांगला असतो. तथापि सध्याचे व्यापारी कांचेसाठीं उपयोगी पडणारी सफेत वाळू न विकतां ती पिंगट रंगाच्या वाळूशीं मिश्रण करून विकतात. कारण ती फौंड्रीसाठी उपयुक्त असते व त्यास मुंबई–पुण्यासारख्या शहरांत मागणीहि फार असते. दरवर्षी सर्व प्रकारची मिळून सुमारें १०,००० टन वाळू काढण्यांत येत असली तरी वरील ठिकाणीं सुमारें ७० लाख टन वाळूचे सांठे आहेत.

**चिकण माती**

कप–बशा, मातीचीं भांडीं, विटा वगैरे तयार करण्याकरतां लागणारी चिकण माती रत्नागिरी जिल्ह्यांमध्यें अनेक ठिकाणीं सांपडते. रत्नागिरी जिल्ह्यांतील मालवण, वेंगुर्ले, कुडाळ व सावंतवाडी, लांजें, दापोली, राजापूर ह्या तालुक्यांत चिकण माती सांपडते. मालवण तालुक्यांत तर चिनी माती सांपडते. सध्यां फक्त कुंभारमाठी येथीलच माती काढण्याचें काम चालू आहे. येथील चिकण माती शुद्ध करून ती कापडगिरण्या व भांडीं बनविण्याचे कारखाने यांकरितां मुंबई येथें पाठविली जाते.

**अभ्रक**

महाराष्ट्रांतील अनेक ठिकाणीं जरी अभ्रक सांपडण्याची शक्यता असली तरी सर्वांत महत्त्वाचे सांठे रत्नागिरी जिल्ह्याच्या सावंतवाडी , कुडाळ, कणकवली, व मालवण या तालुक्यांत सांपडले आहेत. कुडाळ तालुक्यांतील कडावलच्या पूर्वेस आवळेगांव ते पांगार्डे या ६ मैल लांबीच्या पट्ट्यांत अभ्रक सांपडला असून तो ५० पासून ५०० फुटांपर्यंत खोल सांपडूं शकेल. केवळ कडावल येथेंच ३००० फूट लांबीचा अभ्रकाचा पट्टा दिसतो. या भागांतील खाणींतून मोठ्या प्रमाणावर खाजगी लोकांकडून अभ्रक काढला गेला असला तरी आजूबाजूला अद्याप बरेच सांठे आहेत. पृष्ठभागावरील अभ्रकापेक्षां तळाकडील अभ्रक चांगल्या प्रकारचा असतो. आतांपर्यंत फक्त पृष्ठभागावरील अभ्रकच काढण्यांत आला आहे. १९४५ ते १९५१ या काळांत येथील बराच अभ्रक काढण्यांत आला तरी आणखी कित्येक वर्षे पुरेल इतका सांठा उपलब्ध होण्याची शक्यता असल्यानें या भागाची तपशीलवार पाहणी करण्यांत येत आहे.

**मँगनीज** सावंतवाडी व वेंगुर्ले तालुक्यांत मँगनीजचे सांठे सांपडले असून त्यांपैकीं गाळेल, फोंडयें व आडेली येथील सांठे महत्त्वाचे आहेत.

**बॉक्साईट** ॲल्युमिनियम तयार करण्याकरतां मुख्यतः लागणारा कच्चा धातू म्हणजे बॉक्साईट. जिल्ह्यांतील घाट माथ्यावरच्या आंबोली या ठिकाणीं बॉक्साईटचे सांठे आढळले असून ते ५ लक्ष टन तरी असावें असा अंदाज आहे.

**जंगल संपत्ति** रत्नागिरी जिल्ह्यांत मोसमी वाऱ्यांचा पाऊस भरपूर पडत असल्यामुळें जिकडे तिकड हिरवींगार जंगलें दृष्टीस पडतात. ह्या जंगलांत आढळणारे साग, कलम, बांबू, वगैरे प्रकारचे लांकूड औद्योगिक दृष्टचा महत्त्वाचें आहे.

जहाजें बांधण्याकरतां लागणारें लांकूड मिळावें म्हणून रत्नागिरी जिल्ह्यांत त्या जातींचीं झाडें लावण्यांत येणार आहेत. तसेंच आगपेटया तयार करण्याकरतां लागणारीं झाडें व औषधोपयोगी वनस्पति यांचीहि लागवड केली जाणार आहे. जंगलवाढीसाठीं ५५,००० एकर क्षेत्र घेण्यांत आलें असून सावंतवाडी यथें एक सबडिव्हिजन सुरू करण्यांत आली आहे.

**औषधोपयोगी वनस्पति** सह्याद्रीच्या जंगलांत सर्पगंधा, कुडा, जटामाशी, अंजना वगैरे औषधोपयोगी वनस्पति विपुल आहेत. फोंडा येथील जंगलांत वाकेरीचें भातें, हिरडा, आवळकाठी, वावडिंग, सप्तरंगी वगैरे वनस्पति सांपडतात.

मंडणगड, देवगड, संगमेश्वर, चिपळूण, खेड व रत्नागिरी ह्या तालुक्यांतील महसूल विभागाच्या अधिकाराखालील कांहीं क्षेत्रहि जंगल वाढीच्या कार्यक्रमासाठीं जंगल विभागाकडे देण्यांत येणार आहे.

जिल्ह्यांत कोयनेची व हिरण्यकेशीची वीज उपलब्ध झाल्यावर मोठ्या प्रमाणावर जिल्ह्याचा औद्योगिक विकास होऊं शकेल. वेंगुर्ला, सावंतवाडी व रत्नागिरी तालुक्यांत वर नमूद केल्याप्रमाणें अशुद्ध

**उद्योगधंदे** लोखंड व एल्युमनाईटच्या उत्खननाचें काम चालू आहे. वेंगुर्ला व कुडाळ तालुक्यांत पुन्हा मायका सिलिका खाणीचा शोध लागला आहे. काजूचे चार कारखाने वेंगुर्ला व मालवण येथें आहेत. हा सर्व माल परदेशांत जातो. कारखान्यासाठीं लागणाऱ्या काजू-बिया आफ्रिकेसारख्या परदेशांतून येतात. रत्नागिरीस आंबा टिनच्या डब्यांत भरण्याचे दोन कारखाने आहेत. लवकरच राजापूर तालुक्यांतील कशेळी गांवांत सहकारी पद्धतीवर मंगलोरी कौलांचा कारखाना सुरू होत आहे.

वेंगुर्लें येथें गेल्या वर्षी एक सहकारी काजू कारखाना सुरू झाला असून अशा प्रकारचा भारतांतील हा पहिलाच कारखाना असावा. मालवणला असाच एक सहकारी कारखाना सुरू करण्याची तजवीज चालू आहे.

सावंतवाडीच्या आजूबाजूला विड्या तयार करण्याचे कारखाने आहेत.

वेंगुर्ल्यांत जुलै १९५९ पासून ४८ एकर जमिनीवर आंब्याचें संशोधन केंद्र सुरू झालें आहे. हें केंद्र इंडियन कौन्सिल ऑफ् अॅग्रिकल्चरल रिसर्च या संस्थेमार्फत चालविण्यांत येतें. जमिनीचा कस, खत वापरण्याचें प्रमाण व आंब्याच्या उत्कृष्ट जाती यावर संशोधन करण्यांत येतें. येथील आंबा व आल्फोन्सो आंबा यांचा ग्राफ्टिंग पद्धतीवर संयोग करण्यांत येतो. आंब्याच्या जवळ जवळ १०० जाती या संशोधन केंद्रावर लावण्यांत आल्या आहेत. या केंद्रावर आतांपर्यंत ८६,७६५ रु. खर्च झाले असून प्रगति समाधानकारक आहे.

**आंबा संशोधन केंद्र**

शेतकी विभागामार्फत भाटचा येथें ( रत्नागिरीजवळ ) नारळाच्या उपयुक्त जाती निर्माण करण्याकरितां सप्टेंबर १९५७ मध्यें संशोधन केंद्र सुरूं करण्यांत आलें. प्रथम भारतीय मध्यवर्ती नारळ संशोधन समितीकडून हें संशोधन केंद्र सुरूं करण्यांत आलें. पुढें हें राज्यसरकारच्या आर्थिक सहाय्यानें शेतकी विभागामार्फत चालू ठवण्यांत आलें.

**नारळ संशोधन केंद्र**

आतांपर्यंत या संशोधन केंद्रावर १,१,३२५ रुपये खर्च करण्यांत आले. येथें ३० एकर जागेंत जमिनीचा कस व नारळाच्या उत्कृष्ट जाती निर्माण करणें या संबंधी संशोधन चालू आहे.

---

# शेतकी उत्पादन

शतकी विभागामार्फत शेतीउत्पादन वाढविण्यासाठीं भातशेती मार्गदर्शक योजना, खरीप योजना, काजू विकास योजना, फळफळावळ उत्पादन योजना, बी पुरविण्याची योजना, रासायनिक खतें, विहिरी खोदण्यासाठीं तगाई, कंपोस्ट खतपुरवठा व संशोधन अशा अनेक योजना चालू आहेत.

| क्षेत्रफळ व पिकें | एकर |
|---|---|
| जिल्ह्याचें क्षेत्रफळ | ३२,१२,८०० |
| धान्योत्पादनाखालील जमीन | ८,०३,५०० |
| शेतीस योग्य अशी पडिक जमीन | ७,१५,६७८ |
| पडिक व नापीक जमीन | ८,४४,१०० |
| जंगल | ४६,९५५ |
| **प्रमुख पिकें** | |
| भात | ३,१५,८४० |
| नागली | १,४८,९१८ |
| कोदरा | ६४,००० |
| वरी | ४१,००० |
| डाळी | ४०,००० |
| नारळी | १५,९१७ |
| सुपारी | ३,६२८ |
| आंबा | ७,८५९ |
| काजू | ४,६५६ |

जपानी पद्धतीनें भातशेती करून जास्तीत जास्त धान्योत्पादन व्हावें म्हणून सहकारी सोसायटचा-मार्फत रासायनिक खतें व कर्ज दिलें जातें.सोसायटयांच्या सभासदांना कर्ज व रासायनिक खतें पुरविलीं जातात.

**भातशेती मार्गदर्शक योजना**

जिल्ह्यांत असे दोन भातशेती मार्गदर्शक गट आहेत– चिपळूण व कुडाळ. चिपळूण भातशेती मार्गदर्शक गटांमध्यें चिपळूण, संगमेश्वर, गुहागर, दापोली, खेड व मंडणगड हे तालुके येतात. यासाठीं १६,५०० एकर इष्टांक ठेवण्यांत आला असून १३,५०० एकरामध्यें आतांपर्यंत ही योजना लागू करण्यांत आली आहे. कुडाळ भातशेती मार्गदर्शक

गटांमध्यें कुडाळ व सावंतवाडी हे तालुके येतात. १५ हजार एकर इष्टांक जमिनीपैकीं ९ हजार ५०० एकर जमिनींत ही योजना कार्यान्वित करण्यांत आली आहे. १२६४ टन अमोनियम सल्फट व २२८ टन मोनोअमोनियम फॉस्फेट शेतकऱ्यांना पुरविण्यांत आले.

रब्बी पिकाखालीं १० हजार एकर जमिनींत भातशेती करण्यांत येते. खरीप पिकाखालीं ११ हजार एकर जमिनीचा इष्टांक ठेवण्यांत येणार आहे.

**काजूची लागवड**

जिल्ह्यांत ४,६५६ एकर जमिनींत काजूचें उत्पादन घेण्यांत येतें. पण ५ लक्ष एकर जमिनींत ( वरकस जमिनींत ) काजू लावतां येण्यासारखा आहे. काजूचें झाड लावल्यापासून चवथ्या किंवा पांचव्या वर्षीं फळ देतें. १९६०–६१च्या दरम्यान जिल्ह्यांत ५४ हजार एकर जमिनींत काजूची लागवड करण्याचा इष्टांक ठरविण्यांत आला आहे. मंडणगड, दापोली तालुक्यांत १४ हजार एकर जमिनींत काजूची लागवड मागच्या वर्षीं करण्यांत आली. या योजनेंत दर एकरीं रुपये ६० कृषि विभागाकडून कर्ज देण्यांत येतें व दर एकरीं २॥ पौंड काजूचें बीं मोफत देण्यांत येतें. ४ वर्षानंतर या कर्जाची परत फेड हप्त्यांनीं करावयाची असते.

बागायतीखालीं आंबा, नारळी, सुपारी व अननसांच्या लागवडीच्या योजना आहेत. यांत आंबा व नारळी आणि सुपारी यांच्या लागवडीसाठीं दर एकरीं रुपये ३०० कर्ज देण्यांत येते. पांचव्या वर्षांत कर्जवसुली हप्त्यानें करण्यांत येते. प्रत्येक ग्रामसेवकाकरितां कमींत कमी १०० आंब्याचीं कलमें लावण्याचा इष्टांक ठरविला आहे. या वर्षीं २० एकर जमिनींत अननसें लावण्यांत येणार आहेत.

**सुधारलेले बीं**

भात व नागलीचें सुधारलेले बीं तालुक्याच्या सीड फॉर्मवरून सहकारी सोसायट्यामार्फत शेतकऱ्यांना विकलें जातें.

सध्यां भाताच्या जातींत पाटणी–६, पनवेल–६१, वाक्सळ–२०७, भडस–७९, वरंगळ–४८७, कोळंबा–४२, नागली–बीं–११, ह्यांच्या बियांचीं निपज करण्यांत येते. या वर्षांत १६०० बंगाली मण भाताचे बीं सहकारी सोसायट्या व विकास गटांमार्फत शेतकऱ्यांना पुरविण्यांत आले.


**रासायनिक खतें**

खताचें वांटप ग्रामपंचायतीतर्फे, सहकारी सोसायट्यांकडून करण्यांत यतें. या वर्षीं खरीप पिकांसाठीं १४०० टन अमोनियम सल्फेट व ४५० टन मोनो अमोनियम सल्फेट शेतकऱ्यांना पुरविण्यांत आलें.

**बीं व खतासाठीं गुदामें**

खेड, दापोली, रत्नागिरी आणि देवरुख येथें बीं व खतासाठीं शास्त्रोक्त पद्धतीचीं गुदामें बांधण्यांत आलीं आहेत व इतर तालुक्यांच्या गांवीं अशीं गुदामें बांधण्यांत येणार आहेत.

भात-शेतीच्या दर एकरांत कंपोस्ट किंवा झाडपाल्याच्या खतासाठीं निदान एक खड्डा खणण्याचा, ग्रामसेवक व शेतकी मदतनीस यांना इष्टांक ठरवून दिला आहे. तसेंच खेड, चिपळूण, रत्नागिरी, राजापूर मालवण, वेंगुर्ला व सावंतवाडीच्या नगरपालिकांना ७५० टन कंपोस्ट खत तयार करण्याचें उद्दिष्ट ठरवून देण्यांत आलें आहे.


शेतीविकास
▲ संशोधन केंद्र
■ सीड फार्म
मडणगड
गिम्हवणें
खेड तलुका
दापोली तालुका
▲अवशी
चिपळूण पंडी पायलट ब्लॉक
चिपळूण तालुका
पालशेत
गुहागर तालुका
पोमेंडी
संगमेश्वर तालुका
शिरगांव
रत्नागिरी
भाट्यें
हातखंबा
वडगांव
लांजा
राजापूर
देवगड
नांदगांव
फोंडा
कणकवली
कुडाळ तालुका
माणगांव
कुडाळ पंडी पायलट ब्लॉक
वेंगुर्लें
सावंतवाडी तालुका

महसूल विभागातर्फे अडीच हजार व एक हजार रुपयांच्या रकमा अनुक्रमें नव्या विहिरी बांधणें व जुन्या दुरुस्त करण्यासाठीं तगाई म्हणून देण्यांत येतात. मागच्या वर्षी ३०,००० रुपये ८७ विहिरी बांधण्यासाठीं देण्यांत आले. तसेंच या वर्षी पण रुपये ३०,००० देण्यांत येणार आहेत. पाण्याच्या **तगाई** पंपिंग सेटसाठीं पण कर्जाऊ रक्कम देण्यांत येते. या वर्षी ३० पंप बसविण्यांत येणार आहेत.

शेतकऱ्यांच्या संघटना प्रत्येक गांवांत व्हाव्यात असें सरकारी धोरण आहे. यानुसार शेतीच्या विकासाचा कार्यक्रम त्यांच्या सहकार्यानें यशस्वी करतां येईल. जिल्ह्यांत शेतकऱ्यांच्या एकूण एक हजार संघटना झाल्या असून ५५० खेड्यांत अजून त्या व्हावयाच्या आहेत.

शेती संशोधन केंद्रें जिल्ह्यांत ७ ठिकाणीं आहेत– (१) आवाक्षी–येथें जमिनीचा कस यावर, (२) शिरगांव – ( रत्नागिरी ) येथें भाताच्या पिकावर, ( ३ ) भाटये ( रत्नागिरी ) येथें नारळीवर, (४) हातखंबा ( रत्नागिरी ) येथें नागलीवर, (५) फोंडा घाट ( कणकवली ) येथें भातावर, (६) वेंगुर्ल्यांत काजू व आंब्यावर संशोधन होतें. या **संशोधन केंद्रें** शिवाय नांदगांव व वेंगुर्ले येथें नर्सरी आहेत. पोमेंडी ( रत्नागिरी तालुका ), पालशेत ( गुहागर तालुका ), गिम्हवणें ( दापोली ता. ), वडगांव ( लांजा महाल ), माणगांव ( कुडाळ महाल ) येथें सीड फार्म आहेत.

या जिल्ह्यांत पशुसंवर्धनाच्या निरनिराळ्या योजना जिल्ह्यांतील पशुसंवर्धन अधिकारी यांच्या देखरेखीखालीं अंमलांत येतात. या जिल्ह्यांत मंडणगड, दापोली, खेड, चिपळूण, देवरुख, रत्नागिरी, लांजा, राजापूर, देवगड, कणकवली, कुडाळ, वेंगुर्ला व सावंतवाडी या ठिकाणीं पशूसाठीं अद्यावत दवाखाने आहेत. तसेंच गुहागर व मालवण येथें तसेंच लाटवण **पशुसंवर्धनाच्या** ( ता. मंडणगड ) व केळशी ( ता. दापोली ) येथें पशुसंवर्धन केंद्रें आहेत. **सोयी**

राष्ट्रीय विस्तार योजनेंत दापोली तालुक्यांत पालगड, वाणेशी; खेड तालुक्यांत खावटी, लवेल, खोपी, तुंवड; रत्नागिरी तालुक्यांत पावस, हरचेरी, जाकादेवी, मालगुंड; संगमेश्वर तालुक्यांत संगमेश्वर, साखरपा, माखजन, फुणगूस; कुडाळ तालुक्यांत माणगांव व कडावळ व सावंतवाडी तालुक्यांत बांदा व भेडशी येथें पशुसंवर्धन केंद्रें आहेत.

गुरांच्या सुधारलेल्या जाती निर्माण करण्यासाठीं मंडणगड तालुक्यांत लाटवण गांवीं एक सरकारी पशुसंवर्धन केंद्र आहे. याशिवाय कणकवली या महालाच्या ठिकाणीं "गोपुरी" येथें डांगी गुरांचें संवर्धन केंद्र आहे. कुडाळ महालांत पुलास, निलेली व आंबोली घाट या ठिकाणीं अशीं केंद्रें उघडण्याचा विचार आहे.

रत्नागिरीला नवीनच कृत्रिम गर्भधारण केंद्र उघडण्यांत आलें आहे. रत्नागिरीकरितां कोंबडीपालन केंद्र मंजूर झालें असून तें लवकरच उघडण्यांत येईल.

## पशुसंवर्धन



पशूसाठीं
अद्यावत दवाखाने
कृत्रिम गर्भधारणा केन्द्रें
मंडणगड
दापोली
खेड
चिपळूण
देवरुख
रत्नागिरी
लांजा
राजापूर
देवगड
कणकवली
मालवण
कुडाळ
सावंतवाडी
वेंगुर्लें

पुरेसा पैसा जवळ नसल्यामुळें जपानी पद्धतीच्या लागवडीनुसार शेतीच्या सुधारलेल्या पद्धतीचा अवलंब करणें शेतकऱ्यांना कठीण जात असे. महसूल विभागाकडून मिळणाऱ्या तगाईच्या बाबतींतहि असें दिसून आलें कीं, तारण ठेवण्याइतकी पुरेशी जमीन जवळ नसल्याने आणि इतरहि

**भात शेतीची मार्गदर्शक योजना**

कांहीं तांत्रिक अडचणींमुळें तगाईहि त्यांना मिळणें कठीण जाई. म्हणून सरकारनें भात-शेतीची मार्गदर्शक योजना सुरू केली. या योजनेनुसार सहकारी संस्थामार्फत शेतकऱ्यांना कर्जें व खतें वाटण्यांत येतात. त्याप्रमाणें कांहीं सहकारी संस्थांनीं आपल्या शेतकरी सभासदांना एकरीं ११० रु. कर्ज, ७० रु. रोख आणि ४० रु. चें खत अशा प्रमाणांत वांटपहि केलें आहे. जिल्ह्यांत चिपळूण आणि कुडाळ ह्या ठिकाणीं ही योजना सुरू करण्यांत आली असून तिची प्रगति पुढील प्रमाणें आहे–

| | | | |
|---|---|---|---|
| चिपळूण गट | चिपळूण, खेड, संगमेश्वर, गुहागर, दापोली, मंडणगड | | |
| | एकूण उद्दिष्ट | साध्य झालेलें उद्दिष्ट | |
| | १६,५०० एकर | १३,५०० एकर | |
| कुडाळ गट | कुडाळ व सावंतवाडी | | |
| | १५,००० एकर | ९,५०० एकर | |

वायंगण ह्या रबी पिकाखालीं सुमारें १०,००० एकर क्षेत्र आहे. १९५९–६० सालीं सावंतवाडी, कुडाळ आणि वेंगुर्लें ह्या तालुक्यांत ४००० एकरांत जोमदार लागवडीची मोहीम हातीं घेण्यांत आली होती. ह्या मोहिमेमध्यें १२० टन अमोनियम सल्फेट आणि २० टन हाडांची भुकटी रबी भाताच्या पिकाकरतां शेतकऱ्यांना देण्यांत आली. १९६०–६१ सालीं सावंतवाडी, कुडाळ, वेंगुर्ला व मालवण तालुक्यांत मिळून ७३ शे एकर क्षेत्र रबीच्या जोमदार पिकाखालीं आणण्याचा विचार आहे.

**पाणीपुरवठा**

ज्यांच्यापासून शेतीस पाणीपुरवठा होऊं शकेल अशा विहिरी रत्नागिरी जिल्ह्यांत बहुधा नाहींतच. फक्त मालवण तालुक्यांतील धामापूर, पेंडूर व वराड येथील तलावांचें पाणी शेतीला वापरतां येतें.

कोंकणांत जरी अनेक नद्या असल्या तरी त्या खडकाळ भागांतून वाहात असल्याने व त्यांच्या किनाऱ्यावर भात शेतीस उपयुक्त अशी जमीन नसल्यामुळें त्यांना पाट काढणें शक्य नाहीं. मार्चनंतर तर पुष्कळशा नद्या कोरडया होतात. तथापि कांहीं नद्यांना पावसाळयांत भरपूर पाणी असतें. तें पाणी बंधारे बांधून मिळवतां येईल व पाऊस नसेल त्या वेळीं वापरतां येईल. तसेंच तें रबी पिकांकरितां आणि बागायती जमिनीकरितांहि वापरतां येईल.

अन्नधान्याच्या बाबतींत रत्नागिरी जिल्हा तुटीचा आहे. म्हणून स्थानिक धान्योत्पादन वाढविण्याचे सर्वतोपरी प्रयत्न होत आहेत. या बाबतींत छोटया पाटबंधारे योजनांचा कांहीं उपयोग होऊं शकेल म्हणून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें ५० लाख रु. खर्चाच्या योजना सुरू करण्याचा सरकारचा विचार आहे.

**जलाशय** मालवण तालुक्यांतील धामापूरचा तलाव सोडला तर सबंध जिल्ह्यांत नांव घेण्याजोगें तळें किंवा जलाशय नाहीं. धामापूरचें तळें ३७ फूट खोल असून ५०० एकर जमिनीस पाणीपुरवठा होतो. पेंडूर येथील तलावांतून ८० एकरांना आणि वराड येथील तळ्यांतून ११० एकरांना पाणीपुरवठा होतो.

**खार जमिनींची सुधारणा** खार जमीन विकास मंडळाकडून, मंडणगड, चिपळूण, रत्नागिरी, राजापूर, देवगड, मालवण तालुका आणि वेंगुर्ला व कुडाळ महाल या विभागांत एकूण १८ खार जमीन योजना हातीं घेऊन पूर्ण करण्यांत आल्या.

खालीं निर्देशित केलेल्या सरकारी जमिनींना सदर योजना लागू केली आहे:—

| योजनेचें नांव | सरकारी जमिनीचें क्षेत्र | आतांपर्यंत उपयोगांत आणलेलें क्षेत्र |
|---|---|---|
| | ए. गु. | ए. गु. |
| १. तिरलोट खार जमीन योजना | ११– ४ | |
| २. काळुस्ते भिले खार जमीन योजना | ४९–२७ | ४७–३ |

वायरी, आडारी, कांदळगांव आणि मालवण तालुक्यांतील आचरा या ठिकाणीं सुद्धां कांहीं नवीन योजना असून त्या मंडळाकडून विचारांत घेतल्या जात आहेत.

खार जमीन विकास मंडळामार्फत रत्नागिरी जिल्ह्यांत पुढीलप्रमाणें कामें करण्यांत आलीं–

| १<br>तालुक्याचें नांव | २<br>योजनेचा क्रमांक | ३<br>उपयोगांत आणलेली जमीन<br>ए. गु. | ४<br>बांधकामाला आलेला खर्च रु. | ५<br>शेरा |
|---|---|---|---|---|
| मंडणगड | १ | १६२–१३$\frac{3}{4}$ | १२,७५८ | पूर्ण |
| चिपळूण | २ | १६१–३४$\frac{3}{4}$ | २३,४१७ | पूर्ण |
| रत्नागिरी | १ | ११५–१२ | ९,७२२ | पूर्ण |
| मालवण | ५ | ४६९–२०$\frac{1}{2}$ | ६२,४०५ | पूर्ण |
| कुडाळ | १ | ७९–११ | १४,८९८ | पूर्ण |
| वेंगुर्ला | ७ | ६४९– ७$\frac{1}{4}$ | ७७,९९१ | ५ पूर्ण<br>२ चालू |
| राजापूर | ३ | ७६८–१०$\frac{1}{4}$ | ७०,५०५ | २ पूर्ण<br>१ चालू |
| देवगड | ३ | ३७४–२३$\frac{1}{4}$ | १६,६३४ | २ पूर्ण<br>१ चालू |
| एकूण | २३ | २७८०.१२$\frac{1}{2}$ | २,८८,३८० | १९ पूर्ण<br>४ चालू |

रत्नागिरी जिल्ह्यांतील ३२,१२,८०० एकर जमिनीपैकीं ८,०३,५०० एकर जमिनीची मशागत होते. उरलेल्या २४,०९,३०० एकर जमिनीपैकी २०,००,००० एकर वरकस जमीन टेंकडयांच्या उतारावर आहे. नागलीच्या शेतीसाठीं खासगी मालकीच्या ह्या जमिनीवरील झाडें निष्काळजीपणें तोडलीं जातात. यामुळें होणारी जमिनीची झीज भरून काढण्यासाठीं या क्षेत्रावर पुन्हा वृक्षारोपण करणें जरूर आहे. या हेतूनें १,००,००० एकर जमीन ताब्यांत घेऊन तेथें ५ वर्षाच्या अवधींत वृक्षारोपण करण्याचा सरकारचा विचार आहे.

**भूसंरक्षण**

ताबा घेतलेल्या जमिनीचें संरक्षण करण्यासाठीं वृक्षारोपण करण्यांत येते. टीक, ऐन, किंजळ, सवार, शिवन, जांबुळ, हिरडा, बिबळा, आंबा, फणस इ० उपयुक्त झाडांची लावणी करण्यांत येते. अंदाजपत्रकांत १९६० ते ६१ या वर्षांत २९८८ एकर जमिनीवरील जंगलें राखण्यासाठीं तरतूद करण्यांत आली असून ह्यासाठीं केलेली १,११,०००रु.ची तरतूद अपुरी असल्यामुळें १२,४०० रु. अधिक रकमेची मागणी करण्यांत आली. सरकारनें ही रक्कम आकस्मिक खर्च म्हणून मंजूर केली आहे. उपलब्ध नोकरवर्गाच्या सहाय्यानें एकूण २,९८८ एकर जमिनीवर जंगलें राखण्याचें लक्ष्य साधलें जात आहे. तिसऱ्या योजनेंत हेंच कार्य पुढें चालू ठेवण्यांत येणार आहे.

**जंगलें**

रत्नागिरी जिल्ह्यामध्यें भातशेतीला जरी कमी वाव असला तरी फळ-बागायतीला बराच वाव आहे. या जिल्ह्यामध्यें आंबा, फणस, काजू, नारळ, इत्यादींच्या वाढीला अनुकूल असें हवामान असून या मालाला मुंबई येथें चांगली मागणी व बाजारपेठ आहे. रत्नागिरीचे आंबे भारतामध्यें प्रसिद्ध आहेत. ह्या फळांचीं झाडें समुद्रकांठच्या प्रदेशांत आणि प्रामुख्यानें टेकडयांच्या उतारावरील भागांत मोठ्या प्रमाणांत आणि अल्पावधींत वाढतात. ह्या फळांच्या कलमांची लागवड केल्यानंतर सुमारें ५ ते ६ वर्षानंतर त्यांना फळें येण्यास सुरवात होते. दर वर्षी सुमारें ४० लाख रुपये किंमतीच्या आंब्यांची आवक या जिल्ह्यांतून मुंबईला होते. म्हणून ह्या धंद्याला डॉलर मिळवून देणारा धंदा असें संबोधण्यांत येतें. सध्या हा धंदा मुठभर लोकांच्या हातीं असून त्याची वाढ जर सहकारी तत्त्वावर केली गेली तर त्यापासून अधिक फायदा होऊ शकेल.

**फळ–बागाईत**

या जिल्ह्यांतील खडकाळ जमिनीमध्यें काजूंचीं झाडें विखुरलीं असून त्यांच्या जोपासनेकडे आंब्याइतकें लक्ष द्यावें लागत नाहीं. काजू हा आंब्याप्रमाणेंच 'डॉलर' मिळवून देणारा धंदा आहे. काजूसाठीं बाजारपेठ मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असून मालवण आणि वेंगुर्ला येथें त्याचे चार कारखाने आहेत.

नारळ व सुपारी यांचीं झाडें समुद्रकांठच्या जमिनीमध्यें आणि खाडीच्या बाजूनें विखुरलीं आहेत. यांच्या वाढीला क्षारयुक्त हवामान आवश्यक असल्यामुळें हीं झाडें प्रामुख्यानें समुद्रकांठीं वाढतात.

**नारळ व सुपारी**

आंब्याखालीं ७,८५९ एकर, फणसाखाली २०० एकर, काजूखाली ४,६५६ एकर, नारळीखाली १५,९१७ एकर आणि सुपारीखाली ३,६२८ एकर जमीन लागवडीस आणली गेली आहे.

---

# उद्योगधंद्यांची वाढ

रत्नागिरी जिल्ह्यांत काथ्या, कात, हिरडा, कातडी कमाविणें, बांबूकाम, लांकडी खेळणीं, मासेमारी, काजू, नारळ, सुपारी, आंबा, कोकम, व मीठ यांचें उत्पादन करणें व त्यांची विक्री करणें हे उद्योग-धंदे चालतात. हा व्यापार कुंभार्ली, आंबा, फोंडा, आंबोली, खेड--सातारा या पांच घाट रस्त्यांनीं आणि समुद्रांतून गलबतांद्वारें होतो. मुंबईहून दाभोळ, पूर्णगड, वेंगुर्ला लाईनच्या बोटी सुटतात. त्याद्वारें हर्णै, दाभोळ, पालशेत, बोऱ्या, जयगड, तिवरी, रत्नागिरी, रनपार, पूर्णगड, मुसाकाजी, आचरें, मालवण, वेंगुर्ला येथें ये–जा करतां येते. गलबतवाहतूक सप्टेंबर तें मेपर्यंत चालू असते.

रत्नागिरी जिल्ह्यांत ६२ औद्योगिक सहकारी सोसायटयांचें कामकाज चालू आहे. काथ्या कामाच्या तीन संस्था जिल्ह्याच्या दक्षिण भागांत सुरू करण्यांत आल्या आहेत. त्यांत तीन महिन्यांचा कोर्स असून दर वेळीं २० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. विद्यार्थ्यांस दरमहा २० रुपये शिक्षण वेतन दिलें जातें. या तीन संस्थांतून आतांपर्यंत ११३१ विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यांत आलें आहे.

**सरकारी संस्था**

याशिवाय काथ्याकामाच्या दोन सहकारी शाळा सुरू आहेत. त्याचा कोर्स एक वर्षाचा असून शिक्षणवेतन २० ते २५ रुपये दरमहा दिलें जातें. आजवर २३४ विद्यार्थ्यांनीं या शाळेंतून शिक्षण घेतलें असून ते या धंद्याच्या भरभराटीसाठीं प्रयत्न करीत आहेत. त्याशिवाय काथ्या–विण–कामाचें एक वर्कशॉप अरोंदा येथें चालू असून वेंगुर्ला येथें एक फॅक्टरी सुरू आहे.

**काथ्याकामाचें शिक्षण**

ताग कामाच्या शाळा देवगड आणि राजापूर भागांत आहेत. तेथेंहि शिक्षणक्रम एक वर्षाचा असून १५ विद्यार्थ्यांना २० ते २५ रुपये दरमहा शिक्षण वेतन म्हणून दिले जातात. आजवर एकूण १४३ विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडले आहेत. १९५०–५१ सालापासून एक होजिअरी प्रशिक्षण केंद्र सुरू असून त्यांत सहा महिन्याचा शिक्षणक्रम आहे. १७४ विद्यार्थ्यांनीं त्या संस्थेंतून शिक्षणक्रम संपवून सहकारी तत्त्वावर धंद्याची उभारणी केली आहे. याशिवाय सुतारकी, कोंबडीपालन, आणि कातडी कमाविणें यांचें शिक्षण देणाऱ्याहि संस्था उघडण्यांत आल्या आहेत.

**तागकाम**

**हातमाग**

हातमाग धंद्याच्या १० विणकर सहकारी सोसायटचा आहेत. १००० हातमाग या जिल्ह्यांत आहेत. पैकीं ६८४ सहकारी तत्त्वावर सुरू आहेत. देवंग विणकर सहकारी सोसायटी व केतकी-मालडोली विणकर सहकारी सोसायटचांना यंत्रमाग चालविण्यासाठीं सहाय्य देण्याचा विचार चालू आहे.

जिल्ह्यांत काथ्याकामाच्या ६, तागकामाची (देवगड येथें) एक व कातडी कमविण्याच्या ४ सहकारी सोसायटचा आहेत. सहा महिला सहकारी सोसायटचा असून त्यापैकीं कांहीं द्वारा घरगुती सामान, कागदी फुलें, पत्रावळी, शिवणकाम, भरतकाम वगैरे कामें केलीं जातात. संगमेश्वर महिला सोसायटीनें अंबर चरखा-कार्य हातीं घेतलें आहे तर केळशी सोसायटीनें अल्पबचत मोहिमेंत भाग घेतला आहे. गुहागर, पोफळी, दापोली येथें लेबर कांट्रॅक्ट सोसायटचा व चार कुंभारकाम सोसायटचा आहेत. त्यामध्यें भांडीं तयार करणें, मंगलोरी कौलें, विटा तयार करणें इत्यादि कामें केलीं जातात. कशेळी येथील सहकारी कौल कार-खान्यास सरकारनें ९९,००० रुपये मंजूर केले आहेत. कळमठ कुंभारकाम सोसायटीलाहि ग्रामोद्योग बोर्डा-कडून १२ हजार रुपयांचें अनुदान मिळालें आहे. याशिवाय तेलघाणी सुतारकी, लोहारकी, होजिअरी, विण-काम, ओतकाम, मीठउत्पादन , साबण कारखानें आदींना जरूर तें सहाय्य दिलें आहे.

**औद्योगिक प्रशिक्षण केंद्र**

१८६३ साली ए. टी. क्रॉफर्ड नांवाच्या इंग्रजानें लांकूड कापण्यासाठीं " सॉ मिल कंपनी " स्थापन केली. पुढें १८७९ सालांत जिल्हा लोकल बोर्डानें ही कंपनी आपल्या ताब्यांत घेतली व तें व्हांपासून "डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड स्कूल" म्हणून यास संबोधण्यांत येऊं लागलें. १९१५ पर्यंत कॉलेज ऑफ् इंजिनिअरिंग मार्फत परीक्षा घेण्यांत येंत व सुतारकाम, ड्रॉइंग, विणकाम इत्यादि येथें शिकविण्यांत येत असे. यासाठीं मॅट्रिकपेक्षां कमी शैक्षणिक पात्रता असलेल्यांना देखील प्रवेश मिळत असे. पुढें या संस्थेचा व्याप वाढत जाऊन १९४१ सालांत मुंबईच्या डायरेक्टोरेट ऑफ् इंडस्ट्रीज विभागामार्फत हे स्कूल चालविण्यांत येऊं लागले व यास स्कूल ऑफ् इंडस्ट्री असें नांव पडलें. १९५९ पासून या संस्थेंस इंडस्ट्रीयल ट्रेनिंग इन्स्टीटयूट म्हणून मान्यता मिळाली.

इंडस्ट्रीयल ट्रेनिंग इंन्स्टीटयूटची पुढील तीन शाखांत विभागणी केली आहे :–

**स्कूल ऑफ् इंडस्ट्री**

यांत सुतारकाम, फिटर, मोटार मेकॅनिक, ट्रेसर, वायरमन, अप्रेंटिसचे अभ्यासक्रम शिकविले जातात. यासाठीं शैक्षणिक पात्रता ४ थी ते ७ वी पास असावी लागते. या शाखेंत सध्या ४० विद्यार्थी शिक्षण घेत असून ५ शिक्षक आहेत.

**टेक्नीकल हायस्कूल**

यांत १७१ विद्यार्थी शिक्षण घेत असून हे विद्यार्थी येथील पटवर्धन हायस्कूल, फाटक हायस्कूल या दोन हायस्कूलमधून तांत्रिक ऐच्छिक विषय घेऊन येतात. हा अभ्यासक्रम चार वर्षाचा असून ७ वी (मराठी) झाल्यानंतर मशीन ड्रॉइंग, एलिमेंट्स ऑफ इलेक्ट्रिकल अँड मेकॅनिकल इंजिनियरिंग हे विषय घेऊन ११ वीची ( एस्. एस्. सी. ) परीक्षा देतां येते.

इंडस्ट्रीयल ट्रेनिंग इन्स्टीटयूट हा प्रमुख विभाग होय. यांत सिव्हिल व मेकॅनिकल ड्राफ्टस्‌मेन, इले-क्ट्रिशियन, मोटार मेकॅनिक, मशिनिस्ट, टर्नर, फिटर, पॅटर्न मेकर, वेल्डर चे अभ्यासक्रम आहेत. अभ्यासक्रम १८ महिन्यांचा असतो व पुढें ६ महिने प्रशिक्षण घ्यावें लागतें. या अभ्यासक्रमाचें मोफत शिक्षण दिलें जाते. शिवाय ३३ टक्के विद्यार्थ्यांना २५ रुपये शिष्यवृत्ति देण्यांत येते. काम करतेवेळीं घालावयाचे कपडे मोफत देण्यांत येतात. तसेंच ५० टक्के विद्यार्थ्यांची हॉस्टेलमध्यें मोफत राहाण्याची व्यवस्था करण्यांत आलेली आहे.

इंडस्ट्रीयल ट्रेनिंग इन्स्टीटयूटचें आणखी एक वैशिष्टय म्हणजे, परीक्षा या संस्थेमध्यें घण्यांत यते व परीक्षा फी आकारली जात नाहीं. प्रशिक्षणासाठीं चांगल्या संस्थेंत शिष्यवृत्ति देऊन पाठविण्याची व्यवस्था होते. या अभ्यासक्रमास किमान शैक्षणिक पात्रता ९ वी पास व कांहीं अभ्यासक्रमासाठीं ११ वी ( एस्. एम्. सी. ) पास हवी असते.

**काजूसंशोधन केंद्रें**

महाराष्ट्र सरकारनें, रत्नागिरी जिल्ह्यांत काजूची लागवड करून लोकांचें उत्पन्न वाढवावें, काजू-कारखाने निघून बेकारी कमी व्हावी, या हेतूनें काजूविषयक योजना सुरू केली आहे. काजूचें उत्पादन कसे वाढवावें याबद्दल उपाययोजना सुचविण्यासाठीं सरकारनें वेंगुर्लें येथें एक काजूसंशोधन केंद्र सुरूं केलें आहे. चांगलें बी–बियाणें पुरविण्यासाठीं दापोली व वेंगुर्लें या भागांत काजू केंद्रें उघडण्यांत आलीं आहेत. विकास गटांमार्फतहि चांगल्या काजू बियाण्याचा पुरवठा केला जातो.

रत्नागिरी जिल्ह्यांत कमीत कमी पांच लक्ष एकर जमिनींत काजूची लागवड करावी असा महाराष्ट्र सरकारचा विचार आहे. दोन हजार एकर क्षेत्रांत काजूची लागवड झाली तर त्यामुळें एक सहकारी काजू-कारखाना चालविण्याइतकें काम निर्माण होईल. पांच लक्ष एकरांत काजूची शास्त्रीय पद्धतीनें लागवड होऊं शकली तर २५० कारखाने निघूं शकतील. प्रत्येक कारखान्यांत किमान २०० मजूरांना वर्षभर काम मिळूं शकेल. या हिशेबानें ५०,००० लोकांना वर्षभर काम मिळून शेतीच्या हंगामानंतर जी बेकारीची परिस्थिति निर्माण होते ती दूर होईल. आज ज्या जमिनींत गवत सुद्धां होत नाहीं त्या जमिनींतून हे सर्व उत्पन्न होणार आहे.

लोकांनीं प्रयत्न करण्याची तयारी दर्शविली तर सरकार अनेक प्रकारांनीं मदत करण्यास तयार आहे. काजूलागवडीसाठीं सरकार दर एकराला ६० रुपये प्रमाणें दरसाल दरशेंकडा साडेचार दक्के व्याजानें कर्ज देते. काजूच्या उत्तम बिया दर एकराला तीन पौंड या प्रमाणांत बियाण्यासाठीं मोफत वांटल्या जातात. काजूची शास्त्रीय पद्धतीनें लागवड कशी करावी याविषयीं सरकारी तज्ज्ञ माहिती देतात.

रत्नागिरी जिल्ह्यांत नारळाच्या झाडांची लागवड मोठ्या प्रमाणावर होत असल्यानें काथ्या-व्यवसायास चांगलाच वाव आहे. फावल्या वेळांत सुंभ तयार करतांना दक्षिण रत्नागिरींतील किनाऱ्या-जवळचा शेतकरी तुम्हांला दिसेल. सध्याचे शेतकी मंत्री श्री. पी. के. सावंत यांच्या अध्यक्षतेखालीं सरकारनें नेमलेल्या रत्नागिरी जिल्हा गृहोद्योग विकास समितीच्या अहवालानुसार रत्नागिरी जिल्ह्यांत काथ्याचें उत्पन्न अंदाजें ८२,९३४ टन होतें. काथ्या तयार करण्यासाठी फारच थोडा भाग वापरण्यांत येऊन बराचसा भाग सर्पणासाठीं वापरण्यांत येतो. सरकारचें आतां या धंद्याकडे लक्ष वेधलें असून वेंगुर्लें, मालवण, आरोंदा, मिठबांव, रत्नागिरी येथें काथ्याकामाचें शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू करण्यांत आल्या आहेत. आरोंदा येथील शाळेंत तर पिशव्या, गालीचे वगैरे सुन्दर वस्तु तयार होऊं लागल्या आहेत. वेंगुर्लें येथें काथ्याकामाचा एक कारखाना सुरू करण्यांत आला असून सरकारनें त्याकरतां ८०,००० रु. ची मदत दिलेली आहे.

**काथ्याव्यवसाय**

खैराच्या झाडापासून काथ तयार करण्याचा धंदा सावंतवाडी तालुक्यांतील तळवडे गांवच्या लोकांकडून आज कित्येक वर्षे केला जात आहे. शेतीचा हंगाम संपल्यावर सुमारें चार महिने या धंद्यामध्यें तळवडे गांवच्या आजूबाजूच्या गांवांतील कित्येक हजार लोकांना काम मिळतें.

**काथाचा धंदा**

बेळगांव ही काथाची मोठी बाजार पेठ असून दर वर्षी लाखों रुपयांचें काथाचें उत्पादन होतें. रंग तयार करण्याच्या कामीं काथाचा उपयोग केला जातो.

**काजू कारखाने**

काजू भाजून स्वच्छ करण्याचे तीन कारखाने वेंगुर्ल्याला आहेत व एक कारखाना मालवण येथें आहे. पूर्वी कारखान्यांची संख्या याहून जास्त होती. त्यांपैकीं कांहीं बंद पडले. वेंगुर्लें येथें एक सहकारी काजू कारखाना या वर्षापासून सुरू करण्यांत आला आहे. या धंद्यांत सुमारें दोन हजारावर लोक पोट भरतात. भाजलेला काजू घरोघर नेऊन स्वच्छ करून पुनः कारखान्यांत आणून देण्याची या भागांत प्रथा आहे. या दृष्टीनें गृहोद्योग म्हणूनहि याला महत्त्व आहे. येथील काजू मुख्यत्वेंकरून अमेरिकेला रवाना केला जातो. काजूच्या टरफलांपासून तेल काढलें जातें. तें वंगणासाठीं वापरतात. जर या धंद्याचा पद्धतशीर रीतीनें विकास केला गेला तर काजू व त्याच्या टरफलापासून निघणारें तेल यांपासून देशाला डॉलर मिळूं शकतील.

**मासेमारी**

राज्यामध्यें सर्वांत जास्त लांबीचा समुद्रकिनारा फक्त रत्नागिरी जिल्ह्यालाच लाभला आहे. त्यामुळें स्वाभाविक मासेमारीच्या व्यवसायाला जिल्ह्यांत अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे. मासेमारी विभागास तर अनेक आघाडयांवर मोहीम हातीं घ्यावी लागेल. पहिली म्हणजे मासेमारीच्या आधुनिक पद्धतीचा अवलंब करणें आणि नंतर मच्छिमार समाजाचें सामाजिक व आर्थिक मागासलेपण दूर करणें.

सध्या जिल्ह्यामध्यें मच्छिमार विभागामार्फत पुढील विविध योजना चालू आहेत :-

**होडयांचें यांत्रिकीकरण**

होडयांचें यांत्रिकीकरण करण्याकरतां विभागामार्फत मच्छिमार लोकांना ५० टक्के कर्ज व ५० टक्के मदत देण्यांत येते. प्रत्येक होडीच्या किंमतीच्या २५टक्के मदत दिली जाते. १९५९-६० सालीं ५,३२,००० रु. किंमतीचीं ४५ डिझेल इंजिनें तीन होडयांवर बसविण्यांत आलीं. लवकरच ३,५६,००० रु. किंमतीचीं २२ इंजिनें ९ होडयांवर बसविण्याचा विचार आहे.

**अविकसित भागांत यंत्रावर चालणाऱ्या होडयांचें प्रात्यक्षिक**

होडयांच्या यांत्रिकीकरणाचे फायदे मच्छिमार लोकांना पटवून देण्यासाठीं यंत्राच्या सहाय्यानें जाळें फेकून मासे पकडणारी एक होडी जिल्ह्यांत काम करीत आहे. या होडीनें १९५९-६० सालीं ९३ खेपा केल्या आणि सुमारें ५०० मच्छिमारांना प्रात्यक्षिक दाखविण्यांत आलें. हें काम चालू वर्षींहि सुरू राहील.

**विजेवर चालणाऱ्या होडया**

या योजनेखालीं रत्नागिरी जवळच्या समुद्रांत दोन होडया सुरू करण्याचा विचार असून १९६०-६१सालाकरतां २,५४,१७० रु. ची तरतूद करण्यांत आली आहे.

मच्छिमार लोकांनीं पकडलेले मासे किनाऱ्यावरील अन्य शहरांत नेऊन विकण्यासाठीं एक लांच सुरू करण्याचा सरकारचा विचार आहे. त्याशिवाय रत्नागिरी येथें एक बर्फाची फॅक्टरी आणि शीतगृह

बांधण्याचाहि विचार आहे. या फॅक्टरीमधून विभागाच्या होड्यांना लागणारी गरज मासे टिकविणें, भागवूनहि मच्छिमारांना बर्फ पुरविण्यांत येईल. यासाठीं १९६०–६१ सालाकरतां १,८५,८१७ रु. ची तरतूद करण्यांत आली आहे.

**शार्क लिव्हर ऑईल काढण्याचें यंत्र**

जिल्ह्यांतील निरनिराळ्या ठिकाणीं शार्क लिव्हर ऑईल काढण्याचीं सहा यंत्रें बसविण्याचें सरकारनें ठरविलें असून १९६०–६१ सालीं त्याकरतां १३,२५१ रु. खर्च करण्यांत येणार आहेत.

मास पकडण्याकरतां लागणारीं साधनें मच्छिमारांना विकत घेतां यावींत म्हणून १९६०–६१ सालांत ३८,००० रु. ची मदत देण्यांत येणार आहे. १९५९–६० सालीं सुमारें ८,००० रु. ची मदत देण्यांत आली होती.

**मासे खारविण्याच्या सोयी**

मच्छिमारांना मासे चांगल्या प्रकारें खारवितां यावेत म्हणून महत्त्वाच्या ठिकाणीं सॅनिटरी शेडस् बांधण्यांत येत आहेत. त्याकरतां १९५९–६० सालीं २५,००० रु. खर्च करण्यांत आले. १९६०–६१ सालीं देवबाग येथें सॅनिटरी शेड बांधण्यांचें काम हातीं घेण्यांत आलें आहे.

**मासेमारीचें शिक्षण देणाऱ्या शाळा**

रत्नागिरी जिल्ह्यांत मासेमारीचें शिक्षण देणाऱ्या ४ शाळा असून त्यांत १००० विद्यार्थ्यांना मासेमारीच्या शिक्षणाशिवाय, सुतारकाम व इतर शालेय विषयांचें शिक्षण देण्यांत येत आहे.

होड्या किंवा जाळीं दुरुस्त करणें, मासेमारीकरतां लागणारीं इतर साधनें विकत घेणें याकरतां मच्छिमारांना विभागामार्फत कर्जें देण्यांत येतात.

जिल्ह्यांत मच्छिमारांच्या १४ सहकारी संस्था आहेत. मालवण येथील सिंधुदुर्ग मच्छिमार सहकारी सोसायटीमार्फत बर्फाचा एक कारखाना सुरू करण्यांत आला आहे.

---

# सहकार

मागासलेल्या भागांना जर आपला विकास लवकर साधावयाचा असेल तर सहकाराइतका दुसरा परिणामकारक मार्ग नाहीं. रत्नागिरी जिल्ह्यांत सहकारी बँका, सहकारी धान्य सोसायटया, ग्राहक सहकारी संस्था, मीठउत्पादक सहकारी संस्था, मच्छिमार सहकारी सोसायटचा वगैरे स्थापन होत आहेत.

**सहकारी सोसायटचा**

सरकारकडून सहकारी विभागामार्फत आंखलेल्या योजनांची या जिल्ह्यांत लक्ष वेधण्यासारखी प्रगति होत आहे. जिल्ह्याची एकंदर लोकसंख्या १८,२५,००० आहे. ४१,४१२ कुटुंबें दुसरी पंचवार्षिक योजना लागू होण्यापूर्वी सहकारी योजनांच्या कार्यक्षेत्रांत समाविष्ट झालीं होतीं. आज या कुटुंबांची संख्या ७२,००० आहे. १५५० खेडयांपैकीं १४१० खेडीं सहकारी योजनांच्या कार्यक्षेत्रांत समाविष्ट झालीं आहेत.

दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळांत सहकारी विभागाकडून शेतीसाठीं भांडवल, सहकारी तत्त्वावर धान्याची विक्री, व्यापाराचा विकास, फळांचा मुरंबा तयार करणें, शेती व मच्छिमारीच्या सहकारी सोसायटया, धान्याचीं गुदामें व कोठया बांधणें, मागासलेल्या वर्गासाठीं घरबांधणीं सोसायटया स्थापन करणें व सहकारी तत्त्वाचें शिक्षण, प्रशिक्षण देणें व प्रचार करणें या योजना अमलांत आणल्या गेल्या.

**मध्यवर्ती सहकारी बँक**

सहकारी चळवळीस चालना मिळण्यासाठीं येथें सहकारी बँकेची आवश्यकता भासत होती. २५ मे १९५७ रोजीं रत्नागिरींत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सुरू करण्यांत आली. या बँकेच्या सावंतवाडी, कुडाळ दापोली, चिपळूण, कणकवली या ठिकाणीं शाखा आहेत. सरकारनें १९५७–५८ च्या दरम्यान भागीदारी भांडवलासाठीं १ लक्ष रुपये दिले. या बँकेनें शेतीकरितां रुपये १४,४२,४०० व बिगर शेतीकार्यासाठीं रुपये १३,०४,२०० थोडया मुदतीसाठीं व रुपये ३००० मध्यम मुदतीसाठीं दिले आहेत. कर्ज देण्याच्या या कार्याकरितां जिल्हा सहकारी अधिकाऱ्यांची स्वतंत्र नेमणूक झाली आहे.

जिल्ह्यांत सहकारी सोसायटयांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. दुसरी पंचवार्षिक योजना लागू होण्यापूर्वी त्यांची संख्या ५०७ होती, ती आज ७१४ आहे. विशेष म्हणजे या जिल्ह्यांत मच्छीमारीच्य

धंद्याला विशेष महत्त्व असल्यामुळें ठिकठिकाणीं १६ मच्छीमार सहकारी सोसायटया आहेत. तसेंच काजू, आंबे व सुपारी हा माल विक्रीसाठीं तयार करण्याकरितां सहकारी सोसायटयांच्या कार्यांस बराच वाव आहे. सध्यां फक्त वेंगुर्ल्यांत काजूंची एक सहकारी सोसायटी आहे.

जिल्ह्यामध्यें सध्यां अर्बन को–ऑपरेटिव्ह बँका व सोसायटया यांची एकूण संख्या ३१ असून या बँका मुख्यत्वेंकरून खेडयांतील शेतकी पतपेढयांना कर्ज पुरविण्याचें काम करतात.

**विविध कार्यकारी सोसायटया**

रत्नागिरी जिल्ह्यांतील सहकारी चळवळीमध्यें विविध कार्यकारी सोसायटयांचें स्थानहि महत्त्वाचें आहे. विशेषत: रेशनिंगच्या काळांत अन्नधान्याच्या वांटपाचें काम सरकारनें ह्या सोसायटयांकडे सोंपविलें होतें. शेतकी पतपेढया किंवा विविध कार्यकारी सहकारी संस्थांमार्फत फक्त शेतकऱ्यांना कर्ज देण्यांत येतं असे. सध्यां रत्नागिरी जिल्ह्यांत ८१ शेतकी पतपेढया, २०४ लहान विविध कार्यकारी संस्था, २८ मोठया विविध कार्यकारी सहकारी संस्था आणि १२१ सेवा सहकारी सोसायटया आहेत. २८ मोठया विविध कार्यकारी सहकारी सोसायटयांना शेअर भांडवलाच्या रूपानें सरकारतर्फे १,३४,७०० रु. ची मदत देण्यांत आली आहे.

**मच्छीमार सहकारी सोसायटया**

मच्छिमारीच्या विकासाकडे सरकार विशेष लक्ष पुरवीत असून मच्छिमार लोकांच्या सहकारी संस्था स्थापन करण्यास उत्तेजन दिलें जात आहे. आतांपर्यंत रत्नागिरी जिल्ह्यांत मच्छिमार लोकांच्या १४ सहकारी संस्था स्थापन झाल्या असून त्यांत मालवण येथील सिंधुदुर्ग मच्छिमार सहकारी सोसायटीचा खास उल्लेख करावा लागेल. शीतगृह आणि बर्फाचा कारखाना बांधण्याकरतां सदरहू सोसायटीला मच्छिमार विभागाकडून १,०८,००० रु. कर्जवजा मदत देण्यांत आली आहे.

# शैक्षणिक प्रगति

रत्नागिरी जिल्ह्यांत एकूण २५७८ प्राथमिक शाळा आहेत व २४७ मूलोद्योग शाळा आहेत. एकूण २,६२,६२३ विद्यार्थी ( १,५८,५९० मुलें व १,०४,०३३ मुली ) या शाळांमध्यें शिक्षण घेत असतात. मागच्या वर्षापेक्षां या वर्षी या शाळांत मुलांची संख्या ७३२० नें वाढली आहे.

**प्राथमिक शिक्षण**

प्राथमिक शाळांतील शिक्षकांची संख्या ६५५८ असून मागच्या वर्षी ६४८६ शिक्षक काम करीत होते. विशेष म्हणजे शिक्षक म्हणून काम करण्यासाठीं स्त्रियां अधिक प्रमाणांत पुढें येत आहेत.

जिल्ह्यांतील प्राथमिक शिक्षण जिल्हा स्कूल बोर्ड पाहत असतें व शिक्षण विभागाचे अधिकारी पाहणी करीत असतात. जिल्हा स्कूल बोर्डाचे १६ सभासद आहेत. प्राथमिक शिक्षणावर १९६० अखेर पर्यंत रुपये ७९,९३,७५५ खर्च झाले.

**माध्यमिक शिक्षण** रत्नागिरी जिल्ह्यांत एकूण ९९ माध्यमिक शाळा आहेत. ग्रामीण भागांत शाळांची संख्या वाढत आहे.

जिल्ह्यांत रत्नागिरी , मालवण, सावंतवाडी, वेंगुर्लें, चिपळूण व दापोली येथें एस्. एस्. सी. चीं केंद्रें आहेत.

जिल्ह्यांत एकूण मराठी पांचवी ते अकरावी ( एस्. एस्. सी. ) पर्यंतच्या १२ शाळा आहेत. ८ वी ते ११ वीच्या ४३ शाळा व ८ वी ते ९ वी च्या २८ शाळा आहेत. यापैकीं तीन मुलींच्या शाळा आहेत. इतर शाळांत मुलांबरोबर मुली पण शिकतात. माध्यमिक शाळांत विद्यार्थ्यांची संख्या १५,६९० असून मागच्या वर्षी विद्यार्थ्यांची संख्या १३,३७७ होती.

रत्नागिरी जिल्ह्यांत आतांपर्यंत गोगटे कॉलेज हें एकमेव कॉलेज होतें. तें १९४५ सालीं सुरू झालें. सध्यां या कॉलेजांत बी. ए. व बी. एस्सी. पर्यंत शिक्षण दिलें जातें. कॉलेजमध्यें अंदाजे ४०० विद्यार्थी असून सुमारें १०० विद्यार्थ्यांना आणि ४० विद्यार्थिनींना राहाण्यासाठीं वसतिगृहेंहि आहेत.

**गोगटे कॉलेज**

कॉलेजमध्यें एन. सी. सी. चीं पथकेंहि आहेत. त्यांपैकीं नौदल पथक असलेलें व पुणें विद्यापीठास जोडलेलें गोगटे कॉलेज हें एकच कॉलेज आहे. या कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं पुणें विद्यापीठाच्या निरनिराळ्या परीक्षांत स्पृहणीय यश मिळविलें आहे.

याशिवाय चालू वर्षापासून सावंतवाडी येथें आर्टस् व सायन्स कॉलेज आणि वेंगुर्लें येथें आर्टस् व कॉमर्स कॉलेज सुरू झालीं आहेत. यामुळें आर्थिक दृष्ट्या जरी हा भाग मागासलेला असला तरी दक्षिण रत्नागिरी भागांत उच्च शिक्षणाची सोय असल्यामुळें शैक्षणिक दृष्ट्या प्रगत आहे.

**विविध उद्देशीय शिक्षण**

जिल्ह्यांतील शाळांपैकीं सहा शाळांमध्यें विविध उद्देशीय शिक्षण दिलें जातें. यांत होम सायन्स, फाइन आर्टस्च्या दोन व शेतकीच्या तीन अशा शाळा आहेत. विविध उद्देशीय शिक्षणावर १९६० अखेर रुपये ६१,०५५ खर्च करण्यांत आले. याशिवाय शिक्षण विभागातर्फें निरनिराळ्या प्रकारचीं अनुदानें ( ग्रँटस् ) व कर्जाऊ रक्कम देण्यांत येते. १९६० अखेरीस रु. १,८८,००० शाळांच्या इमारतीसाठीं, मुलांच्या वसतीगृहासाठीं रुपये २०,००० देण्यांत आले. ४८,००० रुपये चार शाळांना इमारतीसाठीं कर्जाऊ म्हणून देण्यांत आले.

शारीरिक शिक्षण हें प्रत्येक शाळेंत सक्तीचें आहे. ऑक्झीलरी कॅडेट कोअरचे ४३ गट आहेत. पैकीं तीन मुलींचे आहेत. यासाठीं मागच्या वर्षी एकूण रु. ३९०० खर्च करण्यांत आले. १६ शाळांमध्यें शारीरिक शिक्षणांत विशेष प्रशिक्षण घेतलेले २० पुरुष व दोन स्त्रियां काम करतात. यासाठीं मध्यवर्ती व राज्य सरकार पैसा खर्च करते. रत्नागिरी जिल्ह्यांत सात शाळांमध्यें बालवीर पथकें स्थापन झालीं आहेत.

**प्रशिक्षण महाविद्यालयें**

प्राथमिक शिक्षकांसाठीं सात प्रशिक्षण महाविद्यालयें–रत्नागिरी, शिरगांव, दापोली, कणकवली मिठबांव, मालवण व राजापूर येथें आहेत.

रत्नागिरीत आर्. पी. गोगटे कॉलेज व इंडस्ट्रीयल ट्रेनिंग इन्स्टीटयूट व सावंतवाडीस टी. एम्, मेकॅनिकल व इंडस्ट्रीयल सेंटर आहे.

**समाज-शिक्षण**

साक्षरतेचे वर्गहि या जिल्ह्यांत शिक्षण विभागामार्फत घेण्यांत येतात. १९५९–६० सालांत १७२ समाज–शिक्षण वर्ग घेण्यांत आले व १४२४ इसमांना साक्षर करण्यांत आले. १९५९–६० सालांत यासाठीं सरकारकडून रुपये ४०८४ खर्च झाले. साक्षरतेची एक जोरदार मोहीम आंखण्यांत येऊन विकास गटांमार्फत १९५वर्ग घेण्यांत आले. त्यामुळें४९४५ इसम साक्षर झाले आहेत.

या जिल्ह्यांत समाज–शिक्षण केंद्रें स्थापन करण्याची योजना कार्यान्वित होत असून या योजनेनुसार १९ समाज–केंद्रे स्थापन झालीं आहेत. तीं प्राथमिक शाळांस संलग्न असतात. प्रत्येक समाज केंद्रास १०० रुपये मदत म्हणून देण्यांत येतात.

जिल्ह्यांत ३८१ खेड्यांत वाचनालयें आहेत. यावर १९५९–६० सालांत १०, १६८ रुपये खर्च झाले.

**समाज–कल्याण**

समाज–कल्याण विभागाच्या वतीनें रत्नागिरी जिल्ह्यांत कार्य सुरू आहे. सन् **१९५९**–६० सालीं या विभागाद्वारें झालेल्या कार्याची माहिती पुढीलप्रमाणें आहे.

याशिवाय चालू वर्षापासून सावंतवाडी येथें आर्टस् व सायन्स कॉलेज आणि वेंगुर्लें येथें आर्टस् व कॉमर्स कॉलेज सुरू झालीं आहेत. यामुळें आर्थिक दृष्ट्या जरी हा भाग मागासलेला असला तरी दक्षिण रत्नागिरी भागांत उच्च शिक्षणाची सोय असल्यामुळें शैक्षणिक दृष्ट्या प्रगत आहे.

जिल्ह्यांतील शाळांपैकीं सहा शाळांमध्यें विविध उद्देशीय शिक्षण दिलें जातें. यांत होम सायन्स, फाइन आर्टस्च्या दोन व शेतकीच्या तीन अशा शाळा आहेत. विविध उद्देशीय शिक्षणावर १९६० अखेर रुपये ६१,०५५ खर्च करण्यांत आले. याशिवाय शिक्षण विभागातर्फे निरनिराळ्या प्रकारचीं अनुदानें (ग्रँटस्) व कर्जाऊ रक्कम देण्यांत येते. १९६० अखेरीस रु. १,८८,००० शाळांच्या इमारतींसाठीं, मुलांच्या वसतीगृहासाठीं रुपये २०,००० देण्यांत आले. ४८,००० रुपये चार शाळांना इमारतीसाठीं कर्जाऊ म्हणून देण्यांत आले.

**विविध उद्देशीय शिक्षण**

शारीरिक शिक्षण हें प्रत्येक शाळेंत सक्तीचें आहे. ऑक्झीलरी कॅडेट कोअरचे ४३ गट आहेत. पैकीं तीन मुलींचे आहेत. यासाठीं मागच्या वर्षी एकूण रु. ३९०० खर्च करण्यांत आले. १६ शाळांमध्यें शारीरिक शिक्षणांत विशेष प्रशिक्षण घेतलेले २० पुरुष व दोन स्त्रियां काम करतात. यासाठीं मध्यवर्ती व राज्य सरकार पैसा खर्च करते. रत्नागिरी जिल्ह्यांत सात शाळांमध्यें बालवीर पथकें स्थापन झालीं आहेत.

**प्रशिक्षण महाविद्यालयें**

प्राथमिक शिक्षकांसाठीं सात प्रशिक्षण महाविद्यालयें—रत्नागिरी, शिरगांव, दापोली, कणकवली मिठबांव, मालवण व राजापूर येथें आहेत.

रत्नागिरींत आर्. पी. गोगटे कॉलेज व इंडस्ट्रीयल ट्रेनिग इन्स्टीटयूट व सावंतवाडीस टी. एम्, मेकॅनिकल व इंडस्ट्रीयल सेंटर आहे.

साक्षरतेचे वर्गहि या जिल्ह्यांत शिक्षण विभागामार्फत घेण्यांत येतात. १९५९–६० सालांत १७२ समाज–शिक्षण वर्ग घेण्यांत आले व १४२४ इसमांना साक्षर करण्यांत आले. १९५९–६० सालांत यासाठीं सरकारकडून रुपये ४०८४ खर्च झाले. साक्षरतेची एक जोरदार मोहीम आंखण्यांत येऊन विकास गटांमार्फत १९५ वर्ग घेण्यांत आले. त्यामुळें ४९४५ इसम साक्षर झाले आहेत.

**समाज-शिक्षण**

या जिल्ह्यात समाज–शिक्षण केंद्र स्थापन करण्याची योजना कार्यान्वित होत असून या योजनेनुसार १९ समाज–केंद्रें स्थापन झाली आहेत. तीं प्राथमिक शाळांस संलग्न असतात. प्रत्येक समाज केंद्रास १०० रुपये मदत म्हणून देण्यांत येतात.

जिल्ह्यांत ३८१ खेड्यांत वाचनालयें आहेत. यावर १९५९–६० सालांत १०, १६८ रुपये खर्च झाले.

**समाज–कल्याण**

समाज–कल्याण विभागाच्या वतीनें रत्नागिरी जिल्ह्यांत कार्य सुरू आहे. सन् १९५९–६० सालीं या विभागाद्वारें झालेल्या कार्याची माहिती पुढीलप्रमाणें आहे.

| अ. नं. | योजनेचें नांव | खर्च रुपये | मदत मिळालेल्यांची संख्या | |
|---|---|---|---|---|
| १ | आर्थिक दृष्टचा मागासलेल्या विद्यार्थ्यांना नादाऱ्या | ४२९९७५–२५ | | ८००० |
| २ | परीक्षा फी ( मागासलेल्या विद्यार्थ्यांना ) | १७७५–०० | ४१ | वर्गीकृत जमाती |
| | | | ७० | इतर मा. जमाती |
| ३ | मागासलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या ( प्राथमिक व माध्यमिक ) | १३५५८–०० | १२५ | वर्गीकृत जमाती |
| | | | २८ | इतर मा. जमाती |
| ४ | माध्यमिक शाळांमध्यें शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना नादाऱ्या | ४४७५८–७५ | २४८ | वर्गीकृत जमाती |
| | | | २६१ | इतर मा. जमाती |
| ५ | संस्कार केंद्रें– | | | |
| | कुडाळ | १७४०–०० | ३५ | विद्यार्थी |
| | लांजा | १७४०–०० | ३० | विद्यार्थी |
| ६ | बालवाडी | १५८०–०० | ४६ | विद्यार्थी |
| ७ | घरगुती धंद्यासाठीं मागासवर्गीच्या लोकांना आर्थिक | | | |
| | सहाय्य– | ९२५–०० | | |
| | कर्ज– | २७७५–०० | | |
| ८ | भटक्या व निमभटक्या लोकांना धंद्यासाठीं मदत | ५५०–०० | ११ | |
| ९ | वर्गीकृत जमातींतील लोकांना दुभती गुरें | | | |
| | सहाय्य– | ६००–०० | ४ | |
| | कर्ज– | ६००–०० | | |
| १० | वर्गीकृत जमातींतील लोकांना घरें दुरुस्तीसाठीं मदत | ३०००–०० | ३० | |
| ११ | वसतिगृहांना आर्थिक मदत | ३५४३३–०० | १८५ | |
| १२ | १९५९–६० सालीं नव्यानें प्रारंभ झालेल्या वसतिगृहांना मदत | २०००–०० | ३४ | विद्यार्थ्यांना |
| १३ | अस्पृश्यता निवारणासाठीं प्रशंसनीय कामगिरी केलेल्या गांवांना मदत | १५००–०० | २ | गांवें |
| १४ | समाज–कल्याण विभागाद्वारें अंमलबजावणी करण्यांत आलेल्या योजनांना जत्रेद्वारें प्रसिद्धि | १००–०० | १ | गांव |
| १५ | अस्पृश्यता निवारण योजनेद्वारें मिश्र वसति–गृहांना उत्तेजनार्थ मदत | ३९७५–०० | १६ | विद्यार्थी |

सदरहू योजना मंडणगड तालुक्यापुरत्या होत्या. त्यामुळे खालील योजनेची अंमलबजावणी केली गेली. सदरहू योजनेचा फायदा ज्यांचें वार्षिक उत्पन्न (सर्व मार्गांनें) ९०० रुपयांहून कमी आहे अश लोकांना जाती व वर्गभेद लक्षांत न घेतां दिला गेला.

| | | रुपये | | |
|---|---|---|---|---|
| १) शेतीच्या उपयोगासाठीं | १) बैलजोडी | १०२०० | १७ | लोकांना |
| | २) बैलगाड्या | २७०० | ९ | लोकांना |
| | ३) शेतीचीं उपकरणें | २०० | २ | लोकांना |
| | २) गाई, म्हशी विकत घेण्यासाठीं– | | | |
| | सहाय्य– | १५० रु. | | |
| | कर्ज– | १५० ,, | १ | इसम |

मागासलेल्या वर्गाच्या सेवेसाठीं या विभागाचे अधिकाधिक प्रयत्न सुरू आहेत.

**दारुबंदीचें कार्य**

दारुबंदीच्या सरकारी धोरणांत रत्नागिरी जिल्ह्यांत यश येत असल्याचें दिसून येत आहे. दारुबंदी व आबकारी विभागामार्फत व्यसनी लोकांना दारूपासून परावृत्त करण्यासाठीं भजन, कीर्तन, प्रवचन, नाटकें, चित्रपट वगैरेसारखे करमणुकीचे कार्यक्रम करून, तसेंच सभा व चर्चेच्या रूपानें, ग्रामपंचायतींच्या व समाजसेवकांच्या सहाय्यानें वारंवार प्रयत्न केले जातात. त्याचा परिणाम म्हणून जिल्ह्यांतील कांहीं गांवांनीं आपल्या गांवांत दारू गाळली जाणार नाहीं व कोणी पिणार नाहीं अशा शपथा घेतल्या आहेत. यांपैकीं कांहीं प्रमुख गांवें पुढीलप्रमाणें आहेत– कुडाळ महाल– साळगांव, झारापी; लांजे महालांत– मठ, कुवें, वाकडे, असुर्डे; रत्नागिरी तालुक्यांत– कासारवेली, गोळप, पावस, मरेवी, हातखंबा, निवळी, संगमेश्वर तालुक्यांत– धामणी, निढळेवाडी. जिल्ह्यांतील सुमारें २८० ग्रामपंचायतीद्वारें दारुबंदी उपसमित्यांचें कार्य सुरू आहे. सन १९५९–६० च्या दारुबंदी सप्ताहांत ५५० लोकांनीं दारू वा इतर अन्य मादक पेय न घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. चालू सालांत नशाबंदी प्रचारासाठीं सिनेमा ६३, नाटकें ६, कलापथकाचे कार्यक्रम ८, पोवाडा १, भजन-कीर्तन १६६, लोकनृत्य १२ व भाषणाचे १८१ कार्यक्रम सादर करण्यांत आले. आणि त्याद्वारें १,००,८०० लोकांना दारुबंदीचा संदेश देण्यांत आला. दारुबंदी कायद्याखालील गुन्हेगारींचीहि संख्या दिवसेंदिवस कमी होत असल्याचें आढळून येतें. दारूबंदीचें यश हें शिक्षणाच्या प्रसारावर अवलंबून आहे आणि या जिल्ह्यांत शिक्षणाचा प्रसार किती होत आहे हें या प्रकरणावरून दिसून येईल.

**वाहतूक आणि दळणवळण**

वाहतूक आणि दळणवळण या बाबतींत विचार करूं जातां रत्नागिरी जिल्ह्यांत पूर्वीपेक्षां थोडीफार प्रगति झाल्याचें आढळतें. देशाला जोडणारे ५ घाटरस्ते आणि पश्चिम किनाऱ्यावरील बंदरें आणि जिल्ह्यांत सुरू असलेला मुंबई-गोवा हा प्रमुख रस्ता हे प्रमुख दळणवळणाचे मार्ग आहेत. या प्रमुख मुंबई-गोवा रस्त्याला जोडरस्ते बांधण्याचें काम चालू आहे. जिल्ह्यांत या बाबतींत प्रगति करायला भरपूर वाव आहे. जिल्ह्यांत आज बऱ्याच एस्. टी. च्या मोटारी धावूं लागल्या आहेत. मे १९५० मध्यें जिल्ह्यांत एस्. टी. चे पांच प्रमुख मार्ग होते. त्याची लांबी ३६६ मैल होती. या महिन्यांत जिल्ह्यांत ७०,५७४ मैल एस्. टी. च्या मोटारी धांवल्या व त्यामधून ४८,५७७ प्रवाश्यांनीं प्रवास केला. ही परिस्थिती १० वर्षांनंतर खूपच पालटली आहे. मे १९६० मध्यें एस्. टी. चे १८० मार्ग होते. त्यांची लांबी ७,८३७ मैल होती. या महि-

त्यांत एस्. टी. च्या मोटारी ६,४२,७३१ मैल धावल्या आणि त्यामधून १०,२१,३३४ प्रवाश्यांनीं प्रवास केला ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे.

**पोस्ट ऑफिसे व टेलिफोन**

१ एप्रिल १९५६ रोजीं रत्नागिरी जिल्ह्यांत १ हेड पोस्ट ऑफिस व ४८ सब् पोस्ट ऑफिसे होतीं. पैकीं ३८ पोस्टांतून तारा करण्याची व्यवस्था होती. ३१८ ब्रँच पोस्ट ऑफिसें होतीं, ६ ठिकाणीं टेलिफोनची पब्लिक कॉल ऑफिसें व एक टेलिफोन एक्स्चेंज होतें, तर आज या जिल्ह्यांत १ हेड पोस्ट–ऑफिस, ५८ सब् पोस्ट ऑफिसापैकीं ४९ पोस्टांतून तारा करण्याची सोय आहे. ३८८ ब्रँच पोस्ट ऑफिसें, २ टेलिफोन एक्स्चेंज, १५ ठिकाणीं टेलिफोन पब्लिक कॉल ऑफिसें आहेत. लवकरच पाली, वाडा, पेडल, रेडी, खोपी येथें तारा करण्याची व्यवस्था होईल. वांदा, देवगड, दापोली, कणकवली, फोंडा येथें टेलेफोनची व्यवस्था करण्यासंबंधीं प्रयत्न चालू आहेत.

**दळणवळण**

रत्नागिरी जिल्ह्यांत ३,२६१ मैल लांबीच्या सडका हव्या आहेत. पहिली पंचवार्षिक योजना सुरू होण्यापूर्वी २२४७ मैल लांबीच्या सडका होत्या. यांत लहान मोठ्या सडकांचा समावेश आहे. शिवाय एक हजार ठिकाणीं क्रॉसिंग ( रस्त्याला ओलांडावे लागते ) आहेत. ३० मोठे पूल असून ७० लहान पूल व ९०० साधारण ओढ्याचे खड्डे आहेत. वरील कार्यक्रम लक्षांत ठेवून १६·११ कोटी रुपयांच्या योजना आंखण्यांत आल्या आहेत. यांत सडकांची सुधारणा, नव्या सडका बांधणे व लहान–मोठ्या पुलांचीं कामें घेण्यांत आलीं आहेत.

**रस्तेबांधणी**

जिल्ह्यांत सडकांची लांबी २३४७·९३ मैल आहे. पैकीं ४४३·७८ मैल लांबीच्या सडका सार्वजनिक बांधकाम विभागाकडे किरकोळ दुरुस्तीसाठीं व १९०४·१५मैल लांब सडका जिल्हा लोकल बोर्डाकडे आहेत. यापैकी राज्य हमरस्ता ३७५·७२ मैल लांबीचा, व ४७५·७८ मैल लांब जिल्ह्यांतील प्रमुख सडका आहेत. बाकीच्या इतर सडका व खेडेगांवांतील सडका आहेत.

**मुंबई-गोवें रस्ता**

रत्नागिरी जिल्ह्यांत कॉन्ट्रॅक्टर्स मिळणें कठीण झाल्यानें, मुंबई–गोवें रस्त्याच्या कामाला १९५८ च्या ऑक्टोबर महिन्यांत आरंभ करण्यांत आला. रत्नागिरी जिल्ह्यांतील ह्यारस्त्याच्या एकूण लांबीपैकीं २६ मैल लांबीचा रस्ता यापूर्वी कॉन्क्रीटचा करण्यांत आला असून, ६२ मैल लांबीच्या रस्त्याचें काम चालू आहे. संपूर्ण काम १९६३ च्या फेब्रुवारी महिन्यांत पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

**रत्नागिरी - कोल्हापूर रस्ता**

रत्नागिरी ते कोल्हापूर हा सुमारें ८० मैल लांबीचा रस्ता संपूर्ण कॉन्क्रीटचा करण्यांत आला आहे. रत्नागिरी बंदर बारमाही झालें तर या रस्त्यावरील वाहतूक आणखी वाढणार आहे. कारण देशावर होणारा गूळ, साखर वगैरे माल या रस्त्यानें रत्नागिरी बंदरांत येऊन तेथून तो बोटीनें रवाना होऊं शकेल.

**देशावरील शहरांशीं व्यापार**

त्याशिवाय, आंबोली, फोंडा, आंबा ह्या घाटांतून कोंकण व देश ह्यांना जोडणारे रस्ते आहेत. बेळगांव, निपाणी, कोल्हापूर वगैरे मोठ्या पेठांतून वेंगुर्ले, सावंतवाडी, कुडाळ, मालवण, राजापूर, रत्नागिरी वगैरे ठिकाणी मोठ्या प्रमाणांत व्यापार चालतो. चिपळूण हीहि मोठी बाजारपेठ असून तेथून कऱ्हाड, सांगली वगैरे शहरांशीं जोडणारे रस्ते आहेत.

जिल्ह्यांत एकूण ६२ योजनांचें बांधकाम चालू आहे. पैकीं सडका व पुलांच्या बांधणींच्या २८ योजना, पाणीपुरवठ्याच्या १७, लहान योजना व इमारतीच्या बांधकामाच्या १७ योजना आहेत. यासाठीं रुपये ३६,८८,०४८ खर्च होतील असा अंदाज आहे.

हातीं घेण्यांत यावयाच्या नवीन योजनांत ३५ सडकांचीं कामें, २२ लहान पाणीपुरवठा योजना व १२ इमारतींचीं बांधकामें आहेत. यासाठीं रुपये २६,१७,०३५ खर्च होतील.

२०६·५० मैल लांब सडकेवर डांबर ( टार आस्फाल्ट) टाकण्याचें काम चालू आहे. मोठे पूल, तेरेखोल खाडीवर, संगमेश्वर तालुक्यांत सप्तलिंगी नदी व बावनदीवर, जगबुडी नदीवर, खेड आंबोली रस्ता, कोळंब खाडीवर ( मालवणजवळ ) वाशिष्टी नदीवर ( चिपळूण तालुक्यांत), केळना नदीवर, तीलवरी नदीवर, पावस नदीवर, पूर्णगड रस्त्यावर व शिरोडा–रेडी रस्त्यावर मोचेमाड नदीवर, बांधण्यांत येणार आहेत.

**पुलांचीं बांधकामें**


लहान पाणीपुरवठ्याच्या २६ योजना पूर्ण झाल्या असून १७ योजनांचें काम चालू आहे व ३३ योजना हातीं घेण्यांत येणार आहेत. जिल्ह्यांत पाणीपुरवठ्याच्या योजनांची पाहणी करण्याचें काम चालू आहे. या जिल्ह्यांत पाणीपुरवठ्याच्या मोठ्या योजना कार्यान्वित करणें कठीण आहे, कारण हा सबंध जिल्हा डोंगराळ आहे व फक्त ४०–४५ मैल रुंद आहे. तरीसुद्धां ४९ लहान पाणीपुरवठा योजना तयार करण्यांत आल्या असून १७ योजनांचीं कामें चालू आहेत. अजून ३२ योजना लवकरच हातीं घेण्यांत येतील. याशिवाय ६२ बंधारे, ५३ तळ्यांच्या दुरुस्तीचीं कामें हातीं घेण्यांत येणार आहेत. कोयनेचें टरबाईनमधील पाणी सुटल्यानंतर तें चिपळूणच्या वाशिष्टी नदींत सोडण्यांत येणार आहे. या पाण्याच्या उपयोगासंबंधीं पण योजना आंखण्यांत येणार आहेत.

**पाणीपुरवठा**

रत्नागिरी हें कोंकणचें महत्त्वाचें बंदर होय. अविकसित अवस्थेंत असतांनाहि सध्या या बंदरांत दररोज ५०० उतारूंची ने-आण होत असते. बंदराच्या मानाने ही ने-आण उल्लेखनीय असून या बंदरांतून प्रतिवर्षी ८०,००० टन मालाची वाहतूक होते. परंतु हें बंदर बारमाही नाहीं. पावसाळ्यांत जहाजांची वाहतूक बंद पडते. मुंबईच्या दक्षिणेस मंगलोरपर्यंत (गोवा प्रदेश सोडून) एकहि बारमाही बंदर नाहीं. रत्नागिरीजवळ बारमाही बंदर बांधण्यासाठीं तेथील लोकांनीं प्रयत्न चालविले आहेत. हें बंदर बांधण्यास सुमारें दोन कोटि रु. खर्च येईल. परंतु यामुळें कोंकणच्या विकासास चालना मिळेल. कारण कोल्हापूरकडील भागांत होणारा सर्व गूळ या बंदरांतून सौराष्ट्र, काठियावाड किंवा मलबार यांसारख्या किनाऱ्यावरील दूरच्या प्रदेशांत सुलभतेनें रवाना करतां येईल. आज रत्नागिरी बंदरांतून सुमारें ८०,००० टन मालाची आयात निर्यात चालते. बारमाही बंदर झाल्यानंतर सुमारे अडीच लक्ष टन मालाची आयात निर्यात होऊं शकेल असा अंदाज आहे. शिवाय जागेच्या अभावी परदेशच्या बोटी कित्येक दिवस मुंबईच्या बंदरांत खोळंबून राहातात, त्या रत्नागिरी बंदराला लागू शकतील व अशा रीतीनें होणारें नुकसान टाळतां येईल. मात्र हें बारमाही बंदर सध्यां जेथें रत्नागिरी बंदर आहे तेथें न होतां, तेथून दोन मैलांवर मिर्याबे येथें अनुकूल अशा जागीं होऊं शकेल असें तज्ज्ञांचें मत आहे. सध्यां रत्नागिरी बंदरांत बोट दूरवर उभी राहात असल्यानें उतारूंचे फार हाल होतात. बारमाही बंदर झाल्यानें उतारूंची चांगली सोय होईल व त्यांची संख्याहि वाढेल. म्हणून बंदराच्या विकासाकरितां तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत तरतूद करण्यांत आली आहे.

**रत्नागिरी येथें बारमाही बंदर**

बंदराचा विकास



बंदरें
कुलाबा जिल्हा
हर्णै
सातारा जिल्हा
दाभोळ
पालशेत
बोरया
जयगड
तिवरी
रत्नागिरी
कोल्हापूर जिल्हा
पूर्णगड
मुसाकाजी
विजयदुर्ग
देवगड
आचरा
मालवण
बेळगांव जिल्हा
वेंगुर्ले
गोवें

रत्नागिरी जिल्ह्याला सुमारें २५० मैल लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. या किनाऱ्यावर लहानमोठीं १३ बंदरें आहेत. त्यांचा विकास करण्याचे प्रयत्न सरकारकडून चालू असून त्याबाबतची थोडक्यांत माहिती पुढें दिली आहे.

**वेंगुर्ले**

ओहोटीच्या वेळीं देखील प्रवासी आणि माल उतरविणें शक्य व्हावें म्हणून १,००,०००रु. खर्चून एक आर. सी. सी. जेटी बांधण्यांत येणार आहे. तसेंच जहाजांना आसरा घेण्याचीहि सोय येथें करण्यांत येणार असून त्याकरितां १,००,००० रु. खर्च येणार आहे. नौकानयनाच्या सोयीसाठीं ४२,५०० रु. खर्चून दिवे बसविण्यांत येणार आहेत. प्रवाश्यांकरतां आणखी एक शेड बांधण्यांत येणार असून त्यासाठीं १६,००० रु. खर्च येईल.

**मालवण**

बंदरांत दिव्यांची सोय करण्यांत येणार असून त्याकरतां ४०,००० रु. खर्च होणार आहेत. बोटींच्या सुरक्षिततेसाठीं खडकाळ भाग दाखविणारे दोन तरते दिवे बंदरांत ठेवण्यांत येणार असून त्यांस ५०,००० रु. खर्च येणार आहे.

मालाच्या चढउतारीसाठीं आणि प्रवासी वाहतुकीकरतां नवीन जेटी बांधण्यांत येणार असून तेथें तीन टनी क्रेन ठेवण्यांत येणार आहे. भरतीच्या अगर ओहोटीच्या वेळींहि येथें वाहतूक करतां येईल. त्याचप्रमाणें या जेटीला जोडणारा एक रस्ताहि बांधण्यांत येणार आहे. ह्या सर्व कामाकरतां २,१६,००० रु. खर्च येईल असा अंदाज आहे. १६,००० रु. खर्चून प्रवाश्यांकरतां एक उत्तम शेड बांधण्यांत आली आहे. बोटींच्या मार्गातील खडक दूर करण्यांत आले असून लवकरच हा मार्ग बोटींना खुला होईल. ह्या कामासाठीं १,०८,००० रु. खर्च आला.

**आचरा** बोटी थांबण्याकरतां १०,००० रु. खर्चून नवीन दिव्यांची सोय करण्यांत येणार आहे.

**देवगड**

भरतीच्या किंवा ओहोटीच्या वेळींहि मालाची चढउतार करण्याकरतां नवीन जेटी बांधण्यांत येत असून प्रवाश्यांकरतां शेड, तिकीट ऑफीस, जोडरस्ता, संडास वगैरे सोयीहि करण्यांत येणार आहेत. त्याकरतां २,२०,००० रु. खर्च येईल असा अंदाज आहे.

**विजयदुर्ग**

या ठिकाणीहि भरतीच्या अगर ओहोटीच्या वेळीं प्रवासी वाहतुकीकरतां ४८,००० रु. खर्चून नवीन आर. सी. सी. जेटी बांधण्यांत येणार आहे. तसेंच मालाच्या चढउतारासाठींहि १,४७,००० रु. खर्चून एक जेटी बांधण्यांत येणार आहे. या मालधक्क्याला जोडणारा एक रस्ताहि बांधला जाणार आहे.

**मुसाकाजी**

जहाजांच्या आणि बोटींच्या सोयीकरतां या बंदरांत २०,००० रु. खर्च करून नवीन दिवे लावण्यांत येणार आहेत. अंबळघरच्या खडकावरहि १७,००० रु. खर्चून एक फिरता दिवा लावण्यांत येणार आहे.

**पूर्णगड व रनपार**

या दोन्ही बंदरांत जहाजें आणि बोटी उभ्या राहाण्याकरतां दिव्यांची सोय केली जाणार आहे.

**रत्नागिरी**

भरतीच्या अगर ओहोटीच्या वेळीं मालाची चढउतार करण्याकरतां २,२५,००० रु. खर्च करून राजीवाडा खाडीवर एक जेटी बांधण्यांत येणार आहे. तसेंच ह्या ठिकाणीं ३ टनाची एक क्रेनहि ठेवण्यांत येणार आहे. राजीवाडा खाडीला जोडणाऱ्या मार्गावर दोन फिरते दिवे लावण्यांत येणार असून त्याकरतां ६०,००० रु. खर्च येणार आहे. मिर्या बे येथेंहि असाच एक दिवा लावण्यांत येणार आहे. राजीवाडा खाडीचें मुख आणि सध्याची जेटी यांच्यामधील किनारा धुपून जाऊं नये म्हणून आवश्यक ती संरक्षक उपाययोजना करण्यांत येणार आहे.

**तिवरी**

सध्याच्या जेटींची दुरुस्ती करण्यांत येईल व त्याकरतां ६,००० रु. खर्च केले जातील. तसेंच १०,००० रु. खर्चून एक नवीन फिरता दिवा बसविण्यांत येईल.

**जयगड**

मालाची चढउतार आणि प्रवासी वाहतूक याकरतां नवीन जेटी बांधण्यांत येणार असून त्यांस १,००,००० रु. खर्च येईल. तसेंच बोटी व जहाजें यांच्या सोयीकरतां पाण्यांत तरते दिवे ठेवण्यांत येतील. त्यास ३०,००० रु. खर्च येईल व सध्यांच्या दिव्यांची दुरुस्ती करण्यांत येईल. बोटी अगर जहाजें बंदरांत शिरतांना मार्ग दिसावा म्हणूनहि १०,००० रु. खर्चून दिव्यांची सोय करण्यांत येणार आहे. धमणखोल बे येथेंहि एक फिरता दिवा बसविण्यांत येणार आहे.

**बोर्या**

प्रवासी व मालवाहतुकीकरतां येथें एक आर. सी. सी. जेटी बांधण्यांत येणार आहे. त्यास २,००,००० रु. खर्च येईल. तसेंच एका फिरत्या दिव्याचीहि सोय करण्यांत येणार आहे.

**पालशेत**

फिरत्या दिव्याची आणि बोटी किंवा जहाजें बंदरांत शिरतांना किंवा बाहेर पडतांना वाळूचा धोका टळावा म्हणून तरत्या दिव्यांची या बंदरांत सोय करण्यांत येणार आहे. त्याकरतां सुमारें ४०,००० रु. खर्च येईल असा अंदाज आहे. उमरघर येथील खडकावरहि एक फिरता दिवा बसविण्यांत येणार आहे. तसेंच गोवळकोट व कारबन यांच्यामधील जलमार्गहि दिव्यांच्या सहाय्यानें दर्शविण्यांत येणार आहे.

येथील जेटीची वाढ आणि दुरुस्ती करण्यांत येणार आहे.

वरील आंकड्यावरून रत्नागिरी जिल्ह्यांतील बंदरांच्या सुधारणेकरतां महाराष्ट्र सरकार सुमारें २२,७०,००० रु. खर्च करणार आहे असें दिसून येईल. त्यांपैकीं कांहीं कामें पूर्ण झालीं आहेत तर कांहीं चालू आहेत.

बंदरांतील गाळ काढण्याकरतां ड्रेजरची सोय करण्यांत येत आहे.

—oo—

# समाज विकास योजना

लोकशाहीमध्यें विकास कार्याची प्रेरक शक्ति जनतेमधूनच निर्माण झाली पाहिजे. सरकार ह्या शक्तीला साधनें पुरवील, मार्गदर्शन करील. परंतु विकास योजनांचा मूळ आधार स्वावलंबन आहे. समाज विकास योजनांचा कार्य-क्रम केवळ अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण ह्यासारख्या प्राथमिक गरजा भागविणाराच नसून ग्रामीण विभागांतील सामाजिक व आर्थिक जीवनाचा मुखवटा पार बदलून टाकणारा असा आहे.

सरकारी आणि बिन सरकारी समित्यांमार्फत जिल्ह्यामध्यें जें विकास कार्य चालू आहे त्यांत एक-सूत्रीपणा राखण्यासाठीं १९५२ सालीं जिल्हा विकास मंडळाची स्थापना झाली. कलेक्टर या मंडळाचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. तसेंच जिल्ह्यांतून निवडून आलेले खासदार, आमदार, जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष, सहकारी सोसायट्यांचे प्रतिनिधी, ग्रामीण विकासाशीं संबंधित अशा विभागांचे अधिकारी हे या मंडळाचे सभासद असतात. या मंडळाच्या पुढीलप्रमाणें ९ पोट समित्या आहेत.

**जिल्हा विकास मंडळ**

(१) शेतकी, (२) सहकार, (३) सार्वजनिक बांधकाम, (४) शिक्षण, आरोग्य, दारु-बंदी, (५) पोलिस सल्लागार पोट समिति, (६) समाज विकास योजना सल्लागार पोट समिति, (७) पुरवठा आणि साखर सल्लागार पोट समिति (८) कामगार कंत्राट सल्लागार समिति, (९) मागासलेल्या वर्गांची उन्नति आणि समाज कल्याण सल्लागार समिति.

जिल्ह्यांतील ११ तालुके आणि ४ महाल या सर्वांना आतां विकास गट लागू झाले आहेत. त्यांची माहिती पुढीलप्रमाणें–

| | विकास गट | प्रकार | केव्हां सुरू झाला | समाज विकास प्रशासन प्रकारचे गट |
|---|---|---|---|---|
| १ | मंडणगड | स्टेज २ | २–१०–१९५६ | १ |
| २ | दापोली | स्टेज १ | ” ” ” | १ १/२ |
| ३ | खेड | स्टेज १ | १– ५– ५६ | २ |
| ४ | संगमेश्वर | ” | २–१०– ५७ | २ १/४ |
| ५ | रत्नागिरी | ” | १– ४– ५७ | २ |
| ६ | सावंतवाडी | ” | १– ४– ५८ | १ ३/४ |
| ७ | कुडाळ | ” | १– ४– ६० | १ १/२ |
| ८ | वेंगुर्ला | ” | २–१०– ६० | १ |
| ९ | चिपळूण | विस्तारपूर्व गट | २–१०– ५९ | २ १/२ |
| १० | गुहागर | ” | ” | १ १/२ |
| ११ | मालवण | ” | ” | २ |
| १२ | देवगड | ” | १– ४– ६० | १ १/२ |
| १३ | कणकवली | ” | ” | १ १/२ |
| १४ | राजापूर | ” | २–१०– ६० | २ |
| १५ | लांजें | ” | ” | १ |

स्टेज २ मधील समाज विकास प्रशासन प्रकारच्या प्रत्येक गटाकरतां दरवर्षी एक लाख रुपयांची तरतूद करण्यांत येते, तर स्टेज १ मधील समाज विकास प्रशासन प्रकारच्या गटाकरतां पांच वर्षांच्या काळासाठीं १२ लाख रु. ची तरतूद करण्यांत येते. विस्तारपूर्व गटांतील समाज विकास प्रशासन गटाकरतां एक वर्षाच्या काळासाठीं २१,२०० रु. ची तरतूद असून त्यांपैकीं २००० रु. शेतीच्या प्रात्यक्षिकांकरतां खर्च करण्यांत येतात.

विकास गटावर होणाऱ्या खर्चाच्या प्रमाणांत त्यांची ‘ अ ’, ‘ ब ’ आणि ‘ क’ अशी वर्गवारी करण्यांत आली आहे. त्यानुसार खेड, दापोली, रत्नागिरी, संगमेश्वर व सावंतवाडी हे विकास गट ‘अ’ वर्गांत मोडतात.

जिल्ह्यांतील प्रत्येक विकास गटांत झालेल्या कार्याची थोडक्यांत माहिती पुढें दिली आहे–

पूर्वीच्या मुंबई राज्यांत १९५२ साली ज्या चार विकास योजना हातीं घेण्यांत आल्या त्यापैकीं मंडणगड विकास गट एक होता . आतां हा दुसऱ्या स्टेजचा विकास गट बनला असून त्यांत ९४ खेडीं येतात.

**मंडणगड विकास गट** : या गटांत गुरांचा दवाखाना व सहकारी सोसायटी यांची स्थापना झाली आहे.

भारतामध्यें असलेल्या अविकसित आणि मागासलेल्या विभागांची चौकशी करून भारत सरकारनें त्या विभागांत खास स्वरूपाच्या कांहीं विकास योजना सुरू करण्याचें ठरविलें आहे. या योजनेनुसार रत्नागिरी जिल्ह्यांतील मंडणगड तालुक्यास ही खास योजना मंजूर करण्यांत आली असून ती अंमलांत येत आहे. ज्या नागरिकांचें उत्पन्न सालीना ९०० रु. पेक्षां कमी असेल त्यास या योजनेनुसार पुढील प्रकारचे सहाय्य मिळूं शकेल. (१) औतासाठीं बैलजोडी, (२) बैलगाडी, (३) शेतीचीं औजारें (४) कुटीरोद्योगासाठीं आवश्यक तें सहकार्य, (५) दुभत्या गाई, म्हशी खरेदी करण्यासाठीं ½ रक्कम मदत व ½ रक्कम कर्जरूपानें दिली जाईल. (६) तेल इंजिनें खरेदी करण्यासाठीं ⅓ रक्कम बिनव्याजी कर्ज आणि ⅓ रक्कम मदत रूपानें मिळं शकेल.

**दापोली विकास गट**

हा पहिल्या स्टेजचा विकास गट असून या विकास गटामध्यें १५३ खेडीं आहेत. त्यापैकी १५१ खेड्यांत ग्राम-पंचायतीचें कार्य चालू आहे. या ठिकाणीं शेतकी, कोंबडीपालन व डेअरी योजना सुरू करण्यासाठीं कर्जरूपानें मदत दिली जात आहे. विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचीहि स्थापना करण्यांत आली आहे.

काजूची लागवड, साक्षरता प्रसार, मलेरियाचें उच्चाटन यासाठीं प्रयत्न केले जात आहेत. सुपर फॉस्फेट व इतर खतांच्या उपयोगांचीं प्रात्यक्षिकें वेळोवेळीं खेडुतांना दाखविलीं जातात.

**खेड विकास गट**

या विकास गटांतील सर्व खेड्यांतून ग्रामपंचायतीचें कार्य चालू आहे. काजूची लागवड केली गेली असून, खतें वाटण्यांत आली आहेत व प्रात्यक्षिकांद्वारा शेतकऱ्यांना सर्व प्रकारें मार्गदर्शन केलें जात आहे. साबण तयार करण्याची योजना महिला मंडळातर्फे चालू आहे. आतांपर्यंत तीन हजार एकर जमीन काजूच्या लागवडीखालीं आणली गेली असून आंब्याच्या लागवडीचें काम हातीं घेण्यांत आलें आहे.

**देवरुख विकास गट** देवरुख–संगमेश्वर विकास गटांत १७२ खेडीं असून सर्व खेड्यांत ग्रामपंचायतीचें कार्य चालू आहे.

कोंबडीपालन, शिवणकला, शिक्षण केंद्र, शेतकऱ्यांना तगाई रूपानें मिळावयाची मदत, गुरांच्या दवाखान्यासाठीं इमारत बांधणें इ. गोष्टीकडे या विकास गटानें विशेष लक्ष पुरविलें असून, त्याचें अपेक्षित फल या भागांतील लोकांना मिळत आहे. तसेंच लोकांची वाढती मागणी लक्षांत घेऊन आतां शाळांसाठीं इमारती बांधण्याचीं कामें हातीं घेण्यांत येत आहेत. सर्व खेड्यांतून डी. डी. टी. चे फवारे मारण्यांत आले असून देवीप्रतिबंधक लस मोठ्या प्रमाणावर टोंचण्यांत आली.

**चिपळूण विकास गट**

हा पूर्व-प्राथमिक विकास गट आहे. या गटांतील नगरपालिका कक्षेच्या विभागाबाहेर सर्व खेड्यांतून ग्रामपंचायती आहेत. या गटांत ५३सहकारी सोसायट्यांची स्थापना झाली आहे. शेतकऱ्यांच्या संघटना, सहकारी सोसायट्या, ग्रामपंचायती, शाळा, महिलामंडळें या बाबतींत हा विकास गट पुढें आहे. सुधारलेले बीं–बियाणें व खतें शेतकऱ्यांना पुरविण्यांत आलीं आहेत. या गटांतील बरीच पडिक जमीन लागवडीखालीं आणली गेली असून राहिलेली जमीनहि लागवडीयोग्य करण्याचें काम लवकरच सुरू होईल. वनमहोत्सव सप्ताहांत या गटांत ९५,६४१ झाडांची लागवड केली गेली.

या पूर्व-प्राथमिक विकास गटांतील सर्व खेड्यांत ग्रामपंचायतींचें कार्य चालू आहे. मच्छिमारांची एक सहकारी सोसायटी स्थापन झाली आहे. भातशेती मार्गदर्शक योजनेनुसार मासळीचें खत, पूर्णिमा खत तसेंच इतर सुधारलेली खतें, यांचा उपयोग करून सुमारें ६०० एकर जमीन लागवडीखालीं आणली आहे. तसेंच सुपारींचीं झाडें व इतर पिकें यांच्यावर रोगप्रतिबंधक औषधांचे फवारे मारून होणारी संभाव्य हानी टाळली आहे. सुमारें वीस हजार झाडें वनमहोत्सवाच्या काळांत या विकास गटांत लावलीं गेली.

**गुहागर विकास गट**

सुतार कामांचें शिक्षण, काथ्याकामाचें शिक्षण, मातीचीं भांडीं बनविण्याचें शिक्षण व विणकाम या बाबतींत या विकासगटांत चाललेलें कार्य उल्लेखनीय असून फळबागा, शेती आणि कोंबड्यापालन या बाबतींतहि चांगली प्रगति आहे.

**रत्नागिरी गट विकास**

कोतवडें येथें प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू असून पावस येथें लवकरच अशा प्रकारचें दुसरें आरोग्य केंद्र सुरू होणार आहे. या भागांतील, पावस, जयगड, पूर्णगड, कोतवडें या गांवांतून महिला मंडळांची स्थापना झालेली आहे. इतर बऱ्याच खेड्यांतून युवक संघटनांचें काम चालू आहे. मलेरिया निर्मूलनासाठीं डी. डी. टी. फवारे मारण्यांत आले आहेत.

या गटांत १२२ खेडीं आहेत व ग्रामपंचायतींचें कार्य सर्वत्र चालू आहे. या ठिकाणीं लवकरच एक आरोग्य केंद्र व आजुबाजूच्या ठिकाणीं तीन उपकेंद्रें चालू व्हावयाचीं आहेत. सावंतवाडी येथें गुरांचा एक दवाखाना असून, दाणोली, मळेवाड या ठिकाणीं आणखीं दोन गुरांचे दवाखाने सुरू व्हावयाचे आहेत. या तालुक्यांत दोन बंधाऱ्यांची कामें मंजूर झालीं आहेत. वाफाली व नानोस येथें सहकारी सोसायट्या सुरू आहेत.

**सावंतवाडी विकासगट**

शाळांच्या इमारती, पिण्याच्या पाण्याच्या विहिरी व रस्ते यांचीं कामें हातीं घेण्यांत आलीं आहेत. या तालुक्यांतील ८२ खेड्यांत मलेरिया प्रतिबंधक औषधांचे फवारे मारण्यांत आले आहेत.

या गटांतील ७२ खेड्यांत ४४ सहकारी सोसायट्या काम करीत आहेत. वनमहोत्सव सप्ताहांत या गटांत आंबा, काजू, नारळ व इतर झाडें मिळून २,९६,०९७ झाडें लावण्यांत आलीं. गटांतील सर्व खेड्यांत मलेरिया प्रतिबंधक औषधाचें फवारे मारण्यांत आले. त्याचप्रमाणें चांगल्या भाताचें बी-बियाणें, नारळीचे बियाणें, अमोनियम सल्फेट व मोनो फॉस्फेट शेतकऱ्यांना पुरविण्यांत आलें.

**कुडाळ गट विकास**

या प्राथमिक गटांतील सर्व खेड्यांत ग्रामपंचायतींचें कार्य चालू आहे. बहुतेक सर्व खेड्यांना सहकारी सोसायट्यांचा फायदा मिळतो. येथील नर्सरींतून आंब्याचीं ५०० व नारळाचीं ५०० कलमें लागवडीसाठीं पुरविण्यांत आलीं. पिकांच्या रक्षणासाठीं गॅस रॉल नांवाचें औषध वापरण्यांत येतें. जंगल विभागानें १०० एकर जमिनींत काजूची लागवड केली आहे. येथें काजू संशोधन केंद्र व आंबा संशोधन केंद्र कार्य करीत आहेत.

**वेंगुर्ला विकास गट**

कणकवली हा पूर्व प्राथमिक गट आहे. या गटांत ३८ सहकारी सोसायट्यांचें कार्य चालू आहे. वनमहोत्सव काळांत ओरसगांव व खारेपाटण येथील ग्रामस्थांनीं सुमारें ४०० रोपट्यांची लागवड केली. या

**कणकवली विकास गट**

गटांतील नागदिवें, खारेपाटण, वडगांव, शेरणे, बेलें या पांच ग्रामपंचायतींनीं एक कमेटी नेमून मृत गुरांची व्यवस्था लावण्याचें काम तिच्याकडे सोपविलें. वनमहोत्सव काळांत या गटांत सर्व ठिकाणीं मिळून दहा हजारांवर झाडें लावण्यांत आलीं. जपानी पद्धतीनें भातशेतीची लागवड कशी करावी याचीं शेतकऱ्यांना वेळोवेळीं प्रात्यक्षिकें दाखविलीं जातात व त्यांना सर्व प्रकारचें मार्गदर्शन आणि सहकार्य देण्यांत येतें.

**देवगड विकास गट**

या गटांत ६४ खेडीं असून त्या सर्वांत ग्रामपंचायतीचें कार्य चालू आहे. येथें २३ सहकारी सोसायटया काम करीत आहेत. काजूचें बी, अमोनियम सल्फेट यांचा पुरवठा शेतकऱ्यांना करण्यांत येतो. याशिवाय तगाईच्या स्वरूपांत कर्जहि दिलें जातें. शेतकरी संघटना, युवक संघटना, यांचें कार्य चांगल्या प्रकारें चालू असून फळबागांची लागवड करणाऱ्या गरजू शेतकऱ्यांना कर्जाच्या रूपानें मदत करण्यांत आली.

**मालवण विकास गट**

तळगांव येथें तलावाचें काम सरकारच्या बांधकाम विभागातर्फे सुरू आहे. सर्व खेडयांतून ग्रामपंचायतीचें कार्य चालू आहे. ग्रामपंचायत, सहकारी सोसायटया, युवक मंडळें, वाचनालयें, शेतकऱ्यांच्या संघटना, भजनी मंडळें, महिला मंडळें हीं, या विभागांतील विशेष उल्लेखनीय कामें आहेत. या विभागांतील मालवण गटांत वनमहोत्सव काळांत सुमारें ३० हजार नवीन झाडें लावण्यांत आलीं.

लांजे महाल व राजापूर तालुक्यांतहि ऑक्टोबर १९६० पासून विकास गट सुरू करण्यांत आले आहेत.

——०○——

# स्थानिक स्वराज्य

**ग्राम पंचायती** दिवसेंदिवस समाजोन्नतीचें कार्य समाजावरच सोपविलें जात असल्यामुळें ग्रामपंचायतींवर ग्रामीण जीवनाचा आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास व इतर कार्यें करण्याची जबाबदारी पडत आहे. या दृष्टीनें स्पर्धा व शिबिरें घेऊन ग्रामपंचायत सरपंच व सेक्रेटरी यांना मार्गदर्शन करण्यांत येतें.

रत्नागिरी जिल्ह्यांत दरवर्षी ग्रामपंचायत स्पर्धा ठेवण्यांत येतात व विभागीय, जिल्हा व तालुका पातळीवर रोख बक्षिसें देण्यांत येतात.

रत्नागिरी जिल्ह्यांत एकूण १५५० खेडीं आहेत व या सर्व गांवांत ग्रामपंचायती आहेत. ग्रामपंचायती ८५३ असून यांत ३७६ स्वतंत्र ग्रामपंचायती व ४७७ गट ग्रामपंचायती आहेत. या ग्रामपंचायतीपैकीं ८०० ग्रामपंचायती घरावर कर आकारण्याचे हक्क वापरतात. ४३४ ग्रामपंचायती दुकानें व हॉटेलें यांवर कर आकारतात. ५८ ग्रामपंचायती आठवडी बाजारावर कर आकारतात, १९२ ग्रामपंचायती यात्रांवर कर आकारतात व ४ ग्रामपंचायती समाजस्वास्थ्यासाठीं केलेल्या सोयींवर कर आकारतात. या पंचायती ग्रामस्वच्छता, शिक्षण, शेतकी सुधारणा, या विषयांवर खर्च करतात. या जिल्ह्यांत एकूण ग्राम पंचायतींचें वार्षिक उत्पन्न रुपये १,१५,५१० असून त्यांचा खर्च ९,१४,७३३ रुपये आहे. उरलेली रक्कम सरकारकडून अनुदानाच्या रूपानें मिळते.

नवीन कायद्यानुसार ग्रामपंचायत सेक्रेटरी–तलाठी अशी एकच जागा करण्यांत येणार असून त्याचें प्रशिक्षण घेण्याकरतां त्यांना बोर्डी ( ठाणें ) येथें पाठविण्यांत येते.

पांच गांवांची एक अशी न्याय पंचायत स्थापण्यांत येते. या न्याय पंचायतीचे सभासद गांवचे सरपंच असतात. या जिल्ह्यांत १४५ न्याय पंचायती आहेत. ३० टक्के सरकारी महसूल ग्रामपंचायतींना देण्यांत येतो.

आतां जिल्हा लोकल बोर्डाचें ग्रामपंचायतीवरील नियंत्रण काढण्यांत आलें असून तें काम जिल्हा ग्राम पंचायत मंडळाकडे सोपविण्यांत आलें आहे. जिल्हाधिकारी या मंडळाचे अध्यक्ष असून जिल्हा ग्राम पंचायत अधिकारी हे अध्यक्षाचे चिटणीस म्हणून काम पाहातात.

सध्यां महाराष्ट्र राज्यांत अमलांत असलेल्या ग्रामपंचायतीविषयक कायद्याचीं कांहीं वैशिष्टचें पुढील प्रमाणें आहेत– (१) प्रत्येक ग्रामपंचायतीवर स्त्रियांसाठीं दोन राखीव जागा, (२) गांवांतील सर्व प्रौढ रहिवाश्यांनीं बनलेल्या अशा एका ग्राम सभेची स्थापना, (३) प्रत्येक जिल्ह्यासाठीं पंचायत मंडळाची स्थापना, (४) ग्राम पंचायतीचा चिटणीस हा पगारी सरकारी नोकर असणें. (५) सरकारनें स्वतःच्या खर्चानें हातीं घ्यावयाचें ग्रामपंचायत चिटणीसांचें प्रशिक्षण. (६) जमीन महसूल गोळा करून त्यासंबंधीचीं कागदपत्रें ठेवण्याचें काम ग्रामपंचायतीवर सोंपविण्याची तरतूद, (७) ग्रामपंचायतीना गांवांत गोळा झालेल्या जमीन महसुलाच्या २५ टक्के इतकें देण्यांत येणारें सहाय्यार्थ अनुदान, (८) पांच किंवा अधिक गावांसाठीं गट न्याय पंचायतीची स्थापना व त्यांना दिवाणी व फौजदारी बाबतीत न्यायदानविषयक विस्तृत अधिकार देण्याची तरतूद.

**ग्रामपंचायत कायदा**

सार्वजनिक कल्याण व विकासविषयक कार्याच्या प्रत्येक क्षेत्रांत ग्रामपंचायतींना विस्तृत अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यांनीं करावयाच्या सक्तीच्या व ऐच्छिक कामासंबंधीचा जुना भेदभाव आतां नष्ट करण्यांत आला आहे. स्वच्छता, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्य, ग्रामसंरक्षण, शेतकी व पशुसंगोपन, ग्रामोद्योग यांपैकीं कोणत्याहि क्षेत्रांतील कोणतेंहि काम त्यांना आतां हातीं घेतां येईल.

**विस्तृत अधिकारक्षेत्र**

ग्रामपंचायतींना निरनिराळे कर व फी आकारण्याचेहि अधिकार आहेत. पुढील बाबतींत त्यांना कर व फी आकारतां येईल. (१) इमारती व जमिनीवरील कर, (२) जकात कर, (३) यात्रेकरूंवरील कर, (४) जत्रा, समारंभ आणि इतर करमणुकीच्या कार्यक्रमावरील कर, (५) मायकली व जनावरांकडून ओढण्यांत येणाऱ्या वाहनांवरील कर, (६) दुकानें, हॉटेल, यंत्रसामुग्रीच्या साह्यानें चालविण्यांत येणारे शेतकीव्यतिरिक्त कोणतेंहि व्यवसाय व जनावरांच्या बाजारांतील दलाल यांच्यावरील कर, (७) सर्वसाधारण स्वच्छताविषयक कर, (८) सर्वसाधारण पाणीपट्टी, (९) सर्वसाधारण व आठवडी बाजारावरील कर (१०) गाडीतळ व टांगा स्टॅण्ड यांवरील कर, (१) खास पाणीपट्टी, (१२) घरगुती वापर आणि जनावरांव्यतिरिक्त इतर कामासाठीं विहिरी व तलावांतील पाणीपुरवठ्याकरितां फी, (१३) कोणत्याहि सार्वजनिक रस्त्यावर अथवा ठिकाणीं तात्पुरतें बांधकाम करण्याबाबत किंवा छप्पर घालण्यासाठी अथवा तात्पुरता वापर करण्याबाबत घ्यावयाची फी, (१४) पंचायतीमार्फत खासगी संडास, आवार वगैरेची खास स्वच्छता ठेवण्याबद्दलची फी, (१५) पंचायतीच्या मालकीच्या अथवा इतर जागांवर बांधण्यांत आलेल्या तळ्यांची सफाई करण्याबाबतची फी आणि (१६) पंचायतीच्या अधिकारांतील चराऊ जमिनीवर गुरें चारण्याबद्दलची फी.

**कर व फी आकरणें**

ग्रामपंचायतींना मार्गदर्शन करण्यासाठीं व त्यांच्या कारभारावर देखरेख ठेवण्याकरितां, जिल्हा ग्रामपंचायत मंडळाची स्थापना करण्याचीहि ग्रामपंचायतविषयक कायद्यांत तरतूद करण्यांत आलेली आहे हीं मंडळें ३ ऑक्टोबर, १९५९ रोजीं अस्तित्वांत आलीं. या मंडळाचें वैशिष्टय असें कीं, त्यावरील सात ते बारा प्रतिनिधी जिल्ह्यांतील ग्रामपंचायतींच्या सरपंचांनी निवडलेले असतात. लोकशाहीच्या तत्त्वास अनुसरून, ग्रामपंचायतींना मार्गदर्शन करण्याचें, त्यांच्यावर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचें कार्य बहुतांशीं या पंचायतींनीं निवडलेल्या प्रतिनिधींकडे सोंपविलें आहे. पंचायतीमध्यें पुढाकारा घेण्याची वृत्ति निर्माण करण्याच्या कामांत ते परिणामकारक कार्य करतील अशी अपेक्षा आहे.

**जिल्हा ग्रामपंचायत मंडळें**

ग्रामपंचायतीचें यश बऱ्याच अंशीं, तिचे सरपंच व इतर सभासद यांची कार्यक्षमता, जबाबदारीची जाणीव आणि हातीं घेतलेल्या कार्यासंबंधींची तळमळ यांवर अवलंबून असतें; त्याचप्रमाणें उत्तम व योग्य प्रकारें प्रशिक्षित अशा चिटणीसावरहि तें अवलंबून असतें. हेंच उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून सरकारनें प्रत्येक तालुक्यांत अथवा गटांत ग्रामपंचायतीविषयक शिबिर भरविण्यासंबंधींची एक योजना मंजूर केली आहे. हें शिबिर दरसाल भरत असतें. तें तीन ते पांच दिवसांचें असतें. त्यामध्यें संबंधित विभागांतील ग्रामपंचायतींचे १०० सरपंच व सभासद भाग घेतात आणि सर्वसामान्य स्वरूपाच्या निरनिराळ्या विषयांवर अनुभवांची देवाणघेवाण आणि चर्चा करतात. त्याचप्रमाणें या शिबिरांतून निरनिराळ्या विभागांतील अधिकाऱ्यांची ववविध विषयांवर व्याख्यानें ठेवण्यांत येतात.

**ग्राम पंचायत शिबिरे**

**नगर पालिका**

चिपळूण, खेड, रत्नागिरी, राजापूर, मालवण, वेंगुर्लें, सावंतवाडी या ठिकाणीं नगरपालिका आहेत.

# आरोग्यव्यवस्था

**रत्नागिरी शहरांत** सिव्हिल हॉस्पिटल ( क्षयरोग वॉर्डसहित ), मेंटल हॉस्पिटल, कुष्ठरोग–हॉस्पिटल, कुडाळ, माणगांव (कुडाळ महाल), आवळेगांव ( कुडाळ महाल ), बांदा ( सावंतवाडी तालुका ), भाटगांव ( गुहागर तालुका ), येथें सरकारी रुग्णालयें आहेत.

**सरकारी मदत मिळणारीं रुग्णालयें**

| | | |
|---|---|---|
| १) | मंडणगड | मंडणगड तालुका |
| २) | दहागांव | ,, |
| ३) | बाणकोट | ,, |
| ४) | पालवणी | ,, |
| ५) | माटवण | दापोली तालुका |
| ६) | दाभोळ | ,, |
| ७) | मांदीवली | ,, |
| ८) | केळशी | ,, |
| ९) | धामणंद | खेड तालुका |
| १०) | खोपी | ,, |
| ११) | लवेल | ,, |
| १२) | शिवतर | ,, |
| १३) | मांडवें | ,, |
| १४) | छाटव | ,, |
| १५) | सौनस | ,, |

| | | |
|---|---|---|
| १६) | मेडवी | गुहागर तालुका |
| १७) | कलकवणें | चिपळूण तालुका |
| १८) | कुट्रें | चिपळूण तालुका |
| १९) | बामनोळी | " |
| २०) | मुरतवडें | " |
| २१) | मार्गतामणें | " |
| २२) | देवळे | संगमेश्वर तालुका |
| २३) | कडवई | " |
| २४) | नायरी | " |
| २५) | सैतवडे | रत्नागिरी तालुका |
| २६) | खानू | " |
| २७) | लांजा | लांजा महाल |
| २८) | शिपोशी | " |
| २९) | भांबेड | " |
| ३०) | रायपाटण | राजापूर तालुका |
| ३१) | जैतापूर | " |
| ३२) | कणकवली | कणकवली महाल |
| ३३) | खारेपाटण | " |
| ३४) | नरवडे | " |
| ३५) | विजयदुर्ग | देवगड तालुका |
| ३६) | शिरगांव | " |
| ३७) | केरवडें | कुडाळ महाल |
| ३८) | केळणें | सावंतवाडी तालुका |
| ३९) | कळमकट | " |
| ४०) | भेडशी | " |
| ४१) | रामगड | मालवण तालुका |
| ४२) | कोचरें | वेंगुर्ला महाल. |


**जिल्हा लोकल बोर्डाचीं रुग्णालयें**

(१) देवरुख, (२) मंडणगड, (३) कणकवली, (४) गुहागर, (५) लांजा, (६) देवगड, (७) दापोली—कुटिर इस्पितळ.

**नगर-पालिकांचीं रुग्णालयें**

( १ ) रत्नागिरी येथें आयुर्वेदिक रुग्णालय असून खेड वेंगुर्ला, चिपळूण, राजापूर व मालवण ह्या ठिकाणीं अॅलोपॅथिक रुग्णालयें आहेत.

आरोग्य—व्यवस्था


प्राथमिक आरोग्य केंद्रें
मेंटल हॉस्पिटल
महारोग्यांसाठीं दवाखाने
रुग्णालयें
जिल्हा लोकल बोर्ड व नगरपालिकेचें दवाखाने
प्रसूति केन्द्र
मंडणगड
नळें
दापोली
खेड
दाभोळ
चिपळूण
गुहागर
भाटगांव
माखजन
संगमेश्वर
कोतवडे
रत्नागिरी
पावस
देवरुख
साखरपा
लांजा
राजापूर
देवगड
कणकवली
मालवण
कडावल
कुडाळ
आवळेगांव
वेंगुर्लें
सावंतवाडी
बांदा
भेडशी

### प्राथमिक स्वास्थ्य केन्द्र

प्रत्येक प्राथमिक स्वास्थ्य केंद्र २० हजार लोकसंख्येकरतां आहे. अशीं केंद्रें खानू ( ता. रत्नागिरी ) व कणकवली येथें आहेत.

### प्रसूति व बालक आरोग्य केंद्र

प्रत्येक प्रसूति व बालक आरोग्य केंद्र १० हजार लोकसंख्येकरतां आहे. अशीं केंद्रें कुडाळ, आणि दापोली येथें आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यांत राष्ट्रीय विस्तार योजनेनुसार विकास गटामार्फत प्राथमिक स्वास्थ्य केंद्रें ठिकठिकाणीं उघडण्यांत आलीं आहेत. प्रत्येक केंद्राचा सुमारें ६० हजार लोकसंख्येस फायदा होतो. त्यांची माहिती समाज विकास प्रकरणांत दिली आहे.

### रत्नागिरी विकास गट

(१) प्राथमिक स्वास्थ्य केंद्र, कोतवडे, उपकेंद्रें गणपतीपुळें, जाकादेवी व जयगड येथें आहेत.

(२) प्राथमिक स्वास्थ्य केंद्र, पावस–उपकेंद्रें हरचेरी, पाली व पूर्णगड येथें आहेत.

### खेड विकास गट

(३) प्राथमिक स्वास्थ्य केंद्र, ववे–उपकेंद्रें शीव व खोपी येथें आहेत.

(४) प्राथमिक स्वास्थ्य केंद्र, लवेल– उपकेंद्र फुरुस, खवटी व आंबोळी येथें आहेत.

### दापोली विकास गट

(५) प्राथमिक स्वास्थ्य केंद्र, दाभोळ–उपकेंद्रें हर्णैं, अगरवैंगणी, गांवतळें व पिसई येथें आहेत.

### संगमेश्वर विकास गट

(६) प्राथमिक स्वास्थ्य केंद्र, संगममेश्वर–उपकेंद्रें फुणगुस, बोरसूट व नायनी येथें आहेत.

(७) प्राथमिक स्वास्थ्य केंद्र, माखजन–उपकेंद्रें कुंभारखनी, कारुचुवें, कडवई येथें आहेत.

(८) प्राथमिक स्वास्थ्य केंद्र, साखरपा – उपकेंद्रें अंगवली, किरबट व करंजारी येथें आहेत.

### सावंतवाडी विकास गट

(९) प्राथमिक स्वास्थ्य केंद्र भेडशी–उपकेंद्रें दोडामार्ग, आंबोली, आइस येथें आहेत.

**कुटुम्ब नियोजन केंद्र**

प्रत्येक केंद्राचा सुमारें २० हजार लोकसंख्येस फायदा होतो. तें खानू, कणकवली, दापोली, कोतवडे ( रत्नागिरी तालुका ), ववें ( खेड तालुका ), रत्नागिरीं व वेंगुर्ला येथें आहेत.

**कुष्ठरोग चिकित्सा व उपचार केंद्र**

प्रत्येक केंद्राचा सुमारें २५ हजार लोकसंख्येस फायदा होतो. तीं चिपळूण, दापोली, कोतवडे ( रत्नागिरी तालुका ) व खेड या ठिकाणीं आहेत.

## मलेरिया निर्मूलन मोहीम

रत्नागिरी जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिति लक्षांत घेतां रत्नागिरी जिल्ह्याचे मलेरिया निर्मूलन मोहिमेसाठीं दोन भाग केले आहेत. पहिल्या विभागांत पुढील तालुके आहेत– रत्नागिरी, संगमेश्वर, चिपळूण, गुहागर, दापोली, खेड, मंडणगड, यांचा एक विभाग. दुसऱ्या विभागांत लांजा, राजापूर, देवगड, कणकवली, मालवण, कुडाळ, वेंगुर्ला व सावंतवाडी हे तालुके आहेत.

**रत्नागिरी विभाग** १– याचें मुख्य केंद्र रत्नागिरी आहे. चार उपकेंद्रें असून तीं अनुक्रमें रत्नागिरी, चिपळूण, खेड व दापोली येथें आहेत.

जिल्ह्यांत मलेरिया निर्मूलन मोहिमेस ५८ सालापासून सुरुवात झाली. या मोहिमेचे खंड असून पहिल्या खंडांत डी. डी. टी. फवारण्यांत आली.

डी. डी. टी. फवारण्याचें काम गेलीं ३ वर्षे सुरू असल्यामुळें मलेरियाच्या फैलावाला आळा बसला आहे.

मलेरिया निर्मूलनाचा दुसरा खंड पण आतां सुरू करण्यांत आला आहे. पहिल्या व दुसऱ्या खंडाच्या संधिकालांत डी. डी. टी. फवारणें आणि मलेरियाचे रोगी शोधून काढून त्यांच्यावर उपचार करणें हे दोन्हींही उपाय वापरले जातील.

ग्रामसेवक, ग्रामपंचायतीचे सेक्रेटरी यांना कर्मचाऱ्यांशीं संपर्क ठेवून आपल्या हद्दींतील मलेरियानें आजारी झालेल्या इसमांची नोंद ठेवतां येईल व त्यांची माहिती कर्मचाऱ्यांना देऊन सहकार्य करतां येईल. अशा रीतीनें मलेरिया निर्मूलन मोहीम यशस्वी करणें शक्य आहे.

**रत्नागिरी येथील वेडयांचें इस्पितळ**

रत्नागिरींतील वेडयांचें इस्पितळ ही एक फार जुनी संस्था आहे. १८८६ सालीं समाजांतील वेडया गुन्हेगारांना कोंडून ठेवण्यासाठीं एक तुरुंग बांधण्यांत येऊन तो येथील सिव्हिल सर्जन यांच्या देखरेखीखाली ठेवण्यांत आला. तेव्हां या वेडयांना वैद्यकीय मदत देण्याची फारच थोडीं साधनें किंवा सोयी उपलब्ध होत्या. इंडियन ल्युनसी ॲक्ट १९१२ सालीं मंजूर करण्यांत आला. पण येथील मानसिक रोग्यांना योग्य ती वैद्यकीय मदत स्वातंत्र्योत्तर काळांतच मिळण्याची सोय होऊं शकली. येथें १९५७ सालीं एका तज्ज्ञ डॉक्टरांची प्रथमच नेमणूक झाली व त्यांना मदतनीस म्हणून एका मानसशास्त्रज्ञाची नेमणूक करण्यांत आली. सध्या ३५०

रोगी या वेडयांच्या इस्पितळांत आहेत व त्यांच्यावर इलेक्ट्रिक शॉक व इन्सुलिन उपचार करण्याची सोय उपलब्ध करण्यांत आली आहे. याशिवाय रोग्यांना इस्पितळाच्या आवारांत हिंडणें, सुतारकाम करणें, शिवणकाम करणें, लिहिणें-वाचणें इत्यादि सोयी करण्यांत आल्या आहेत. त्यांच्यासाठीं खेळ व सिनेमा इत्यादि करमणुकीच्या कार्यक्रमाची देखील सोय करण्यांत आलेली आहे.

---

# वृत्तपत्रें, किल्ले व पवित्र क्षेत्रें

जिल्हापत्रांतून ग्रामीण विभागांतील लोकमताचा कानोसा घेतां येत असल्यामुळें विकास कार्याच्या दृष्टीनें त्यांचें महत्त्व विशेष आहे. या जिल्ह्यांतील वृत्तपत्रांची परंपरा आणि दर्जा उच्च प्रतीचा असून जागृत लोकमताचे पडसाद त्यांत उमटतात. नियमितपणे प्रसिद्ध होणारीं साप्ताहिकें पुढीलप्रमाणें आहेत:—

सत्यशोधक, नवकोंकण, समानता, बलवंत, सेवक हीं साप्ताहिकें रत्नागिरी येथून प्रसिद्ध होतात. सावंतवाडी येथून वैनतेय आणि सत्यप्रकाश हीं साप्ताहिकें प्रसिद्ध होतात. चिपळूणहून चंद्रोदय, कुडाळहून व्याध, वेंगुर्ल्याहून किरात आणि मालवणहून आघाडी हीं साप्ताहिकें प्रसिद्ध होतात.

मागच्या वर्षी अल्पबचत योजनेचा १७ लक्ष रुपयाचा इष्टांक ठेवण्यांत आला होता. तो इष्टांक रत्नागिरी जिल्ह्यानें गांठला. इतकेंच नव्हे तर या जिल्ह्यास तीन लक्ष रुपये बक्षिसापैकीं एक लक्ष रुपयांचें बक्षीस अल्पबचत योजनेंत स्पृहणीय कार्य केल्याबद्दल मिळालें आहे. १९६०–६१ सालाकरितां १८ लक्ष रुपयांचा इष्टांक ठेवण्यांत आला असून या वर्षीही इष्टांकापेक्षा अधिक बचत करून जिल्ह्यानें बक्षीस मिळविलें आहे. बक्षिसाचे पैसे जिल्ह्यांत विविध विकास कार्यावर खर्च करण्यांत येणार आहेत.

**अल्पबचत योजनेचें यश**

**सुवर्ण दुर्ग** हा किल्ला हर्णै बंदरांत असून अद्याप चांगल्या स्थितींत आहे. आंग्र्यांचें येथें आरमार होतें.

दाभोळच्या शेजारीच अंजनवेलचा किल्ला आहे. येथें तुळोजी आंग्र्यानें फ्रेंच लोक नोकरीस ठेवले होते. अंजनवेलच्या दक्षिणेस ८ मैलांवर समुद्रकिनाऱ्यावर गुहागर शहर आहे. येथें वाडेश्वराचें ( शंकराचें ) देवस्थान आहे. येथें राम-लक्ष्मण आले होते असें म्हणतात.

रत्नागिरी तालुक्यांत जयगडला एक जुना किल्ला आहे. अजूनही येथें वस्ती आहे. हा किल्ला दत्ताजी कनोज नांवाच्या कान्होजी आंग्र्यांच्या सरदारानें बांधला.

**गोवळ कोट** चिपळूणजवळ माप नांवाच्या बेटांत गोवळकोट किल्ला आहे. चिपळूणपासून तीन मैलांवर परशुरामाचें देवालय आहे.

**सिंधुदुर्ग** रत्नागिरीच्या किल्ल्यांत अजून वस्ती आहे. भगवती ( शिवकालीन ) व भागेश्वर हीं देवालयें यांत आहेत. रत्नागिरीच्या दक्षिणेस पूर्णगड येथें किल्ला असून तो चांगल्या स्थितींत नाहीं. याशिवाय देवगडला एक व मालवणला सिंधुदुर्ग व तेरेखोल नजीक रेडी येथें किल्ले आहेत.

याशिवाय मंडणगड तालुक्यांत बाणकोट येथें व्हिक्टोरिया, मंडणगड, दापोली तालुक्यांत फत्तेगड, पालगड, कनकदुर्ग, खेड तालुक्यांत महिपतगड, समारगड, रसाळगड, चिपळूण तालुक्यांत जंगली-जयगड व बहिरवगड, गुहागर तालुक्यांत विजयगड व संगमेश्वर तालुक्यांत प्रचितगड, महिपतगड, भवानगड हे किल्ले आहेत.

राजापूर तालुक्यांत आंबूळगड, यशवंतगड, देवगड तालुक्यांत देवगड, विजयदुर्ग व बाहरवगड असे किल्ले आहेत. मालवण तालुक्यांत पदमगड, राजकोट, सर्जेकोट, भगवंतगड, भरतगड, रामगड, सिद्धगड, पांडवगड, नान्दोसगड, वेताळगड; वेंगुर्लें पेठ्यांत रेडी येथें यशवंतगड व निवती येथें किल्ले आहेत.

**रांगणा किल्ला** कणकवली महालांत खारेपाटण येथें एक लहानसा किल्ला आहे. सावंतवाडी तालुक्यांत महादेवगड, हनुमंतगड, आवरें, नारायणगड व वांदे येथें किल्ले आहेत. कुडाळ महालांत रांगणा किल्ला, मनोहरगड, मनसंतोषगड व कुडाळ येथें किल्ले आहेत.

**गणपतीपुळें** रत्नागिरी शहराच्या उत्तरेस १२मैलांवर गणपतीपुळें हें प्राचीन देवालय आहे. इ. स. १६०० च्या सुमारास या गांवचे खोत बाळंभट भिडे यांच्या उपासनेमुळें गणपती स्वयंभू प्रगट झाला असे सांगतात.

तसेंच दापोली तालुक्यांत आंजर्ले येथें कड्यावरचा गणपती स्वयंभू आहे असें म्हणतात. माघ शुद्ध प्रतिपदेपासून पंचमीपर्यंत पांच दिवस येथें मोठा उत्सव होतो. जवळ दुर्गादेवीचें देवालय पण आहे.

**कर्णेश्वराचें देवालय** संगमेश्वरजवळ कर्णेश्वराचें देवालय आहे. हें देवालय चालुक्य घराण्यांतील कर्ण राजानें बांधलें. संगमेश्वरापासून १० मैलांवर श्रीलक्ष्मी मल्लमर्दन नांवाचें देवस्थान आहे. रत्नागिरी तालुक्यांत कोळिसरें येथें लक्ष्मीकेशव नांवाचें देवस्थान आहे. संगमेश्वर तालुक्यांत बुरंबाड येथें शंकराचें मोठें देवालय आहे. दर शिवरात्रीला येथें जत्रा भरत असतें.

**भवानीचें देऊळ** सिंधुदुर्ग किल्ल्यांत भवानीचें देऊळ आहे. कामते येथें ( ता. देवगड ) श्रीभगवतीचें देऊळ आहे.मालवण तालुक्यांत आचरे येथें रामेश्वराचें देऊळ आहे. वालावल (कुडाळ महाल) येथें लक्ष्मी नारायणाचें प्रसिद्ध मंदिर आहे. सावंतवाडी तालुक्यांत साटम महाराजांची समाधी आहे. देवरुख तालुक्यांत ८ मैलांवर डोंगराळ भागांत मारळेश्वर ( शंकराचें ) देवालय आहे. राजापूर तालुक्यांत अडिवरे येथें महाकालीचें मंदिर आहे व धोपेश्वर येथें धूतपापेश्वराचें देऊळ आहे.

**कुंडें** राजापूर येथें ३।४ वर्षांनीं गंगा प्रगट होते. येथें स्नान्यासाठीं कुंडें बांधण्यांत आलीं आहेत.

देवगडजवळ कुणकेश्वराचें ( शंकराचें ) देऊळ आहे. महाशिवरात्रीला येथें यात्रा भरते. जयगड ( रत्नागिरी तालुका ) जवळ नांदिवडे येथें कार्तेश्वराचें देऊळ आहे. गुहागर तालुक्यांत वेळणेश्वराचें व वेंगुर्ल्यांत सातेरी देवीचें मंदिर आहे. परशुरामाच्या ( ता. चिपळूण) देवळाजवळ एक धबधबा आहे.

**अन्नधान्य वांटप**

रत्नागिरी जिल्हा अन्नधान्याच्या आपल्या गरजा भागवूं शकत नसल्यामुळें सरकारमार्फत दरवर्षी २०,००० टन गहूं व २०,००० टन तांदूळ मुंबईहून येथें येतो.

रत्नागिरी जिल्ह्याच्या समुद्र किनाऱ्यावरील २२ बंदरांवरून आंतील प्रमुख अशा ३२ सरकारी गुदामांत माल सांठविण्यांत येतो. अजून अधिक गुदामें बांधण्यांत येणार आहेत.

अन्नधान्य नियंत्रित विक्री कायदा १ नोव्हेंबर १९५८ रोजीं अमलांत आला. कायद्यानुसार ७३० परवाने देण्यांत आले. १०० बंगाली मणाच्यावर अन्नधान्याची विक्री करणाऱ्यांस हे परवाने काढावयाचे असतात.

**स्वस्त धान्याचीं दुकानें**

जिल्ह्यांत एकंदर ३९९ स्वस्त धान्य दुकानें आहेत; पैकीं १११ दुकानें सहकारी सोसायटया, ७९ दुकानें ग्रामपंचायती, एक दुकान नगरपालिका व २०८ खाजगी व्यापारी चालवतात.

कोल्हापूर जिल्ह्यांतून या जिल्ह्यांत साखर येते. साखरपुरवठा पुरेसा होत असून परिस्थिति समाधानकारक आहे.

**तुकडेबंदी, जमीन एकत्रीकरण**

रत्नागिरी जिल्ह्यांत तुकडेबंदी व जमीन एकत्रीकरणाचे प्रयत्न चालूं आहेत. यामुळें धान्योत्पादन वाढून शेतकऱ्यांना शेती करण्यास सुलभता प्राप्त होणार आहे. रत्नागिरी जिल्हा डोंगराळ आहे; शेत-जमिनीचें प्रमाण फारच कमी असल्यामुळें हें काम जनतेच्या सहकार्यावरच अधिक अवलंबून आहे.

लांजा महालांत ६३, खेड तालुक्यांत ४८, दापोली तालुक्यांत ३०, सावंतवाडी तालुक्यांत ३०, कणकवली महालांत १७१, मंडणगड तालुक्यांत ३० व रत्नागिरी तालुक्यांत दोन गांवांत तुकडेबंदी करण्याचा इष्टांक १९७१ पर्यंत गांठावयाचा आहे.

आतांपर्यंत लांजा महाल व खेड तालुक्यांत तुकडेबंदी अनुक्रमें – ३० व १६ गांवांत करण्यांत आली असून अनुक्रमें १५,००० एकर व ११,८०५ एकर जमीन तुकडेबंदीखालीं आली आहे.

## सामुदायिक श्रवण

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि विभागातर्फे ग्रामीण विभागांत पुढील ठिकाणीं रेडिओ सेट बसविण्यांत आले आहेत.

**चिपळूण तालुका**

(१) आसुर्डे, (२) परशुराम (३) पेढांबे (४) रामपूर (५) सावर्डे (६) शिरळ (७) शिरगांव (८) तिवरें (९) पोफळी.

**दापोली तालुका**

(१) आंजर्ले, (२) दापोली, (३) हर्णै (४) जालगांव, (५) केळशी, (६) पाडले, (७) पालगड, (८) उंबरशेत, (९) आडे, (१०) आंबवली.

देवगड तालुका

(१) देवगड, (२) गिर्ये, (३) कोट काम्ते, (४) नारिंग्रे, (५) पडेल, (६) पुरळ, (७) विजयदुर्ग, (८) वाडा.

गुहागर तालुका

(१) अडूर, (२) दोदवली, (३) पालशेत, (४) साखरी -आगर.

कणकवली तालुका

(१) कणकवली ग्रामपंचायत, (२) एस्. एम्. हायस्कूल, (३) कासार्डें, (४) नांदगांव, (५) खारेपाटण, (६) कोळोशी, (७) नाटळ, (८) गोपुरी.

खेड तालुका

(१) धामणंद, (२) धामणदिवी. (३) खवटी, (४) खेड, (५) खोपी, (६) लवेल, (७) मुर्डे, (८) फुरुस, (९) पोंसरे बुद्रुक, (१०) पोंसरें खुर्द, (११) सवनस, (१२) शिव बुद्रुक, (१३) चाकाळें.

कुडाळ (महाल)

(१) आवळेगांव, (२) कसाल, (३) पावशी, (४) पिंगुळी, (५) सरंबळ, (६) डिग्रस, (७) आंब्रड.

लांजा महाल

(१) लांजा, (२) वेरवली बुद्रुक

मालवण तालुका

(१) चौकें, (२) धामापूर, (३) काळसे, (४) कांदळगांव, (५) पेंडुर, (६) वराड.

राजापूर तालुका

(१) जैतापूर, (२) कालिकावाडी पेठ, (३) कशेळी, (४) कोंडयें (५) राजवाडी

रत्नागिरी तालुका

(१) गांवखडी, (२) हरचेरी, (३) हातखंबा, (४) खानू, (५) मालगुंड, (६) नेवरे, (७) पाली, (८) पूर्णगड (९) रत्नागिरी ( नगरवाचनालय )

**सावंतवाडी तालुका**

(१) बांदा (२) मळगांव (ग्रामपंचायत), (३) मळगांव (सरस्वती मंदिर), (४) सावंतवाडी, (५) आरोंदा.

**संगमेश्वर तालुका**


(१) देवरुख, (२) संगमेश्वर, (३) कडवई, (४) माखजन, (५) बुरुंवाड.

**वेंगुर्ला महाल**

(१) आरवली, (२) कोचरे, (३) रेडी, (४) म्हापण, (५) उभादांडा, (६) शिरोडें.

---

## भौगोलिक रचना



उंच प्रदेश
सखल प्रदेश
नद्या
कुलाबा जिल्हा
सातारा जिल्हा
कोल्हापूर जिल्हा
बाणकोटची खाडी
केशळीची खाडी
जोग न.
जगबुडी न.
दाभोळची खाडी
वाशिष्टी न.
जयगडची खाडी
शास्त्री न.
रत्नागिरी
भाट्याची खाडी
काजळी न.
पूर्णगडची खाडी
मुचकुंदी न.
जैतापूरची खाडी
विजयदुर्गची खाडी
देवगडची खाडी
आचऱ्याची खाडी
कर्ली न.
कर्लीची खाडी
तेरेखोळची खाडी
गोवें
बेळगांव

# कोणाकडे कशाची चौकशी करावी

| कामाचें नांव | संबंधित अधिकारी |
| --- | --- |
| १) लागवडीकरितां जमीन, तगाई कर्ज, लोखंड व सिमेंट | जिल्हाधिकारी, अध्यक्ष, जिल्हा विकास मंडळ व तालुका पातळीवर तालुक्याचे मामलेदार, एस्. टी. बस स्टॅन्ड शेजारीं रत्नागिरी फोन नं. –१ |
| २) शेतीच्या सुधारलेल्या पद्धति, रासायनिक खतें, सुधारलेलीं बी–बियाणीं व अवजारें, कीटकनाशक औषधें व फळझाडांच्या लागवडीबद्दल माहिती | जिल्हा शेती अधिकारी घ. नं. ३१२२ टिळक आळी, रत्नागिरी फोन नं. – ६९ |
| ३) सहकारी संस्थांची स्थापना | डेप्युटी रजिस्ट्रार को–ऑपरेटिव्ह सोसायटीज् "सहकार भुवन" घर. नं. १२५५. कोलते बिल्डींग, तेली आळी, रत्नागिरी फोन नं. –४२ |
| ४) शिक्षण संस्थांची स्थापना व कार्य यासंबंधीं माहिती | जिल्हा शिक्षणाधिकारी, रत्नागिरी, घ. नं ९४८, जिल्हा एम्प्लायमेंट कचेरीजवळ रत्नागिरी फोन नं. –६४ |
| ५) प्राथमिक शिक्षण व तत्संबंधीं माहिती | प्रशासक, जिल्हा शिक्षण मंडळ, जेलरोड रत्नागिरी फोन नं. –६८ |
| ६) मागासलेल्या जाती व जमातींना आर्थिक सहाय्य | समाज कल्याण अधिकारी घ. नं. ३०२५ टिळक आळी, रत्नागिरी फोन नं–९१ |
| ७) रस्ते, पूल, घरें बांधणी व प्रवाश्यांची विश्रामस्थानें जागा राखून ठेवण्यासाठीं | एक्झीक्युटिव्ह इंजिनियर कार्यालय रत्नागिरी, कोल्हापूर रोड, रत्नागिरी, फोन नं. –५ |

| | | |
|---|---|---|
| ८) | ग्रामीण भागांत उद्योगधंदे इत्यादीच्या माहिती-साठीं | औद्योगिक अधिकारी, बंदर रोड रत्नागिरी |
| ९) | जनावरांचें संगोपन व त्यांच्या रोगांवर उपाय-योजना | जिल्हा ॲनिमल हज्बंड्री अधिकारी घ. नं. १२५२ तेली आळी, रत्नागिरी. |
| १०) | शहर पाणीपुरवठा व ड्रेनेजसंबंधी | डेप्युटी इंजिनियर, पब्लिक हेल्थ, रत्ना-गिरी कोल्हापूर रोड, रत्नागिरी |
| ११) | सामुदायिक श्रवणासाठीं ग्रामीण भागांत रेडिओ करितां | सुपरवायझर, रुरल ब्राडकॉस्टिंग, मुरली-धर देवळासमोर, बंदर रोड, रत्नागिरी. |
| १२) | सार्वजनिक आरोग्य, साथीचे रोग, इत्यादि | जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा धिकारी कचेरी समोर, रत्नागिरी फोन नं. –९८ |
| १३) | विहिरी, तलाव, रस्ते, शाळा व स्थानिक विकास-कार्याच्या माहितीसाठीं | जिल्हा प्रकल्पाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय कंपौंड फोन नं. –८६ व तालुक्यांतील गटविकास अधिकारी |
| १४) | सर्वोदय क्षेत्रांतील विकास कामें व कार्यपद्धति | संचालक, सर्वोदय केंद्र, गोपुरी, कणकवली तालुका कणकवली |
| १५) | जंगल विभागासंबंधी माहितीसाठीं | सब् डिव्हिजन फॉरेस्ट ऑफिसर सावंत-वाडी, ता. सावंतवाडी, जि. रत्नागिरी |
| १६) | जिल्ह्यांतील पोलिस यंत्रणेसंबंधी | जिल्हा पोलीस प्रमुख, जेलरोड, रत्नागिरी फोन नं. –३ |
| १७) | पोस्ट व तार ऑफिस उघडणें इत्यादि माहितीसाठीं | सुपरिटेंडेंट ऑफ पोस्ट ऑफिसेस्, औट, रम् बंगलो, जेल रोड रत्नागिरी, फोन नं. –४७ |
| १८) | एस्. टी. चे मार्ग व त्यांची कार्यपद्धति व तत्संबंधीं माहितीसाठीं | डिव्हिजनल कंट्रोलर, शिवाजी नगर, रत्नागिरी फोन नं. —३७ |
| १९) | हौशी प्रवाश्यांचीं आर्कषणें व तत्संबंधी व विविध विभागांच्या योजनांसंबंधी माहितीसाठीं | जिल्हा प्रसिद्धि कचेरी, घ. नं. २४९९ धनजी नाका, नारायण निवास, महात्मा गांधी रोड, रत्नागिरी. फोन नं.–२५ |
| २०) | ग्रामीण भागांतील रस्ते पाणी व आरोग्य यासंबंधीं माहिती | जिल्हा लोकल बोर्ड १२१३, रत्नागिरी |

| | | |
|---|---|---|
| | | कोल्हापूर रोड, रत्नागिरी, फोन नं.—२६ |
| २१) | नोकरी मिळवूइच्छिणाऱ्यांची नांवनोंदणी व व्यवसाय, वितरणासंबंधी | जिल्हा एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज ऑफिसर ९२६ "ए" डी. के. जोशी बंगला, मेंटल हॉस्पिटलसमोर, रत्नागिरी, फोन नं.—९९ |
| २२) | माजी सैनिकांच्या, त्यांच्या मुलाबाळांच्या व कुटुं-बियांच्या हितासंबंधीच्या प्रश्नासंबंधीं | जिल्हाधिकारी, अध्यक्ष जिल्हा माजी सैनिक मंडळ, जिल्हाधिकारी कचेरी कार्यालय, रत्नागिरी |
| २३) | अल्प बचत योजना व तत्संबंधीं माहितीसाठीं | जिल्हा अल्पबचत संघटक, जिल्हा-धिकारी कचेरी, रत्नागिरी |
| २४) | तांत्रिक शिक्षणासंबंधींच्या माहितीसाठीं | प्रिन्सिपॉल इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टी-ट्यूट, राजिवडा, रत्नागिरी फोननं. ११४. |

REFBK 0028955
REFBK-0028955

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि विभागाचें प्रकाशन